## प्रत्येकाला सोबत घेऊन देशसेवा करू -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली** : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवार (दि. २४)पासून सुरुवात झाली. लोकसभा निवडणुकीनंतरचे हे पहिलेच अधिवेशन आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, देशाच्या जनतेने आम्हाला तिसऱ्यांदा संधी दिली आहे. हा एक महान विजय आहे. त्यामुळे आमची जबाबदारीही तीनपट वाढते. मी देशवासीयांना विश्वास देऊ इच्छितो की, आमच्या तिसऱ्या कार्यकाळात आम्ही आधीपेक्षा तिप्पट जास्त मेहनत करू आणि प्रत्येकाला सोबत घेऊन देशसेवा करू, असे आश्वासन दिले. सर्व खासदारांकडून देशाला बऱ्याच अपेक्षा आहेत. मी खासदारांना आग्रह करेन की, लोकसेवेसाठी आपण या संधीचा उपयोग करूयात. संविधानाच्या नियमांचे पालन करून लोकसेवेसाठी शक्य ते सर्व प्रयत्न करायला हवे, असेही ते म्हणाले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३३८

www.ramprahar.com

मंगळवार, २५ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


पदवीधर, शिक्षक मतदानासाठी पर्यायी कागदपत्रे ग्राह्य/२

पतीच्या डोक्यात दगड घालून हत्या करणारी पत्नी अटकेत/५

आफ्रिका सेमी फायनलमध्ये; तर विंडीज वर्ल्डकपबाहेर/८


# युपीएससी, एमपीएससी प्रशिक्षण वर्ग सुरू करणार

### अलिबाग येथील मेळाव्यात आमदार निरंजन डावखरे यांचे आश्वासन

**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकणातील प्रत्येक जिल्ह्यात युपीएससी व एमपीएससी परीक्षा प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचे मी प्रयत्न करणार आहे, असे आश्वासन महाराष्ट्र विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघाचे भाजप महायुतीचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांनी रविवारी (दि. २३) अलिबाग येथे दिले. महायुतीतर्फे आयोजित विजयी संकल्प मेळाव्यात ते बोलत होते.



या मेळाव्यास शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, उपाध्यक्ष दिलीप भोईर, वैकुंठ पाटील, ॲड. पल्लवी तुळपुळे, सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, परशुराम म्हात्रे, सहकार आघाडी कोकण प्रांत सहसंयोजक गिरीश तुळपुळे, भाजप तालुकाध्यक्ष उदय काठे, शहराध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, शिवसेना तालुकाध्यक्ष अनंत गोंधळी, दीपक रानवडे, हर्षल पाटील, सतीश लेले, सुनील दामले, शिक्षक संघटनेचे हिरामण कोकाटे आदी उपस्थित होते.

१२ वर्षात भरपूर कामे केली आहेत. पदवीधरांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी सभागृहात आवाज उठवला. अजूनही बरीच कामे करायची आहेत. ती कामे पूर्ण करण्याची संधी मला द्या, असे आवाहन आमदार निरंजन डावखरे यांनी केले.

> **वरिष्ठ सभागृहात प्रतिनिधित्व करण्यासाठी जे गुण असावे लागतात, ते सर्व गुण आमदार निरंजन डावखरे यांच्यात आहेत. त्यांचे काम चांगले आहे. त्यामुळे ते विक्रमी मतांनी विजयी होतील.**
> **-धैर्यशील पाटील, भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष**

आमदार निरंजन डावखरे यांचा विजय निश्चित आहे. ते भरघोस मतांनी विजयी होतील, असे गिरीश तुळपुळे म्हणाले, तर मतदारसंघात महायुतीकडून नियोजनबद्ध प्रचार करण्यात आला आहे. त्यामुळे आमदार निरंजन डावखरे विजयी होतील, असे ॲड. महेश मोहिते यांनी प्रास्ताविकात म्हटले. मिलिंद पाटील यांनी मेळाव्याचे सूत्रसंचालन केले, तर उदय काठे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**आमदार डावखरे सुसंस्कृत नेते -आमदार महेंद्र दळवी**

आमदार निरंजन डावखरे हे सुशिक्षित व सुसंस्कृत नेते आहेत. त्यांनी आपल्या १२ वर्षांच्या कारकिर्दीत अनेक कामे केली आहेत. सभागृहात ते प्रभावीपणे मत मांडतात. लोक त्यांना ओळखतात. त्यामुळे ते या निवडणुकीत सहज जिंकून येतील, असा विश्वास आमदार महेंद्र दळवी यांनी या वेळी व्यक्त केला.

## पुणे ड्रग्सप्रकरणी आरोपींना २९ जूनपर्यंत पोलीस कोठडी

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे एल ३ बार ड्रग्स पार्टी प्रकरणातील आरोपींना सत्र न्यायालयाने २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या पार्टीमध्ये अल्पवयीन मुलांचा समावेश होता का याचा तपास सध्या सुरू आहे.

पुण्यातील एफसी रोडवरील ए ३ बारमध्ये झालेल्या पार्टीची माहिती समोर आल्यानंतर पुण्याचे ड्रग्स कनेक्शन उघड झाले आहे. या पार्टीप्रकरणी आठ जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये संतोष कामठे, सचिन कामठे, उत्कर्ष देशमाने, योगेंद्र गिरासे, रवी माहेश्वरी, अक्षय कामठे, रोहन गायकवाड, दिनेश मानकर यांचा समावेश आहे. आरोपींना सोमवारी कोर्टात आणण्यात आले होते. त्यांना २९ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



सोशल मीडियाद्वारे या पार्टीचे आयोजन करण्यात आले होते तसेच बिल ऑनलाईन पद्धतीने भरले गेले आहे. ड्रग्ज सेवन केलेल्या तरुणांच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले आहेत. रविवारी पहाटे ४ वाजेपर्यंत ४० ते ५० जणांची पार्टी सुरू होती. या ड्रग्स पार्टीचे आणखी काही व्हिडीओ समोर आले आहेत.

## आधी जागावाटप तर होऊ दे!

### विश्वजीत कदमांच्या विधानावर अंबादास दानवेंची प्रतिक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्याचा पुढचा मुख्यमंत्री काँग्रेसचा असेल असे विधान माजी राज्यमंत्री विश्वजीत कदम यांनी सांगलीत झालेल्या एका कार्यक्रमात बोलताना केले होते. त्यांच्या विधानानंतर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, या विधानावर ठाकरे गटाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी, आधी किमान जागावाटप तरी होऊ द्या. येणाऱ्या काळात काहीही होऊ शकते, असे म्हटले आहे.

सांगलीतील कार्यक्रमात बोलताना विश्वजीत कदम यांनी, लोकसभा निवडणुकीत विशाल पाटील यांना सर्वाधिक मताधिक्य मिरजेने दिले. ही निवडणूक सोपी नव्हती. ज्या पक्षात आम्ही काम करीत होते त्याचे पक्षाचे तिकिट मिळत नव्हते. त्यामुळे अन्याय होत असल्याचे पाहून जनतेनेच या निवडणुकीत साथ दिली. आगामी विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात पाच आमदार काँग्रेसचे असतील आणि राज्याचा मुख्यमंत्री काँग्रेसचा असेल, असा दावा केला.

यावर अंबादास दानवे यांनी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना म्हणाले की, अद्याप निवडणूक जाहीर झालेली नाही तसेच जागावाटपदेखील झालेले नाही. खरेतर मुख्यमंत्री कोण होईल हा निवडणुकीनंतरचा विषय आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात काहीही होऊ शकते तसेच नाना पटोले किंवा विश्वजीत कदम काय बोलतात त्याला काँग्रेसमध्ये महत्त्व आहे, असे वाटत नाही.

## पासपोर्ट प्रक्रिया होतेय सुलभ

**नवी दिल्ली** : केंद्रीय परराष्ट्र व्यवहारमंत्री एस जयशंकर यांनी पासपोर्ट अर्जदारांच्या पोलीस पडताळणीत लागणारा वेळ कमी करण्यासाठी परराष्ट्र मंत्रालय काम करीत असल्याचे म्हटले आहे.

पासपोर्ट सेवा दिवसाच्या निमित्ताने जयशंकर म्हणाले की, पासपोर्ट वितरण इकोसिस्टममध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी मंत्रालय राज्य व केंद्रशासित प्रदेश पोलिसांसोबत काम करीत आहे. पोलीस पडताळणी प्रक्रिया सुलभ करणारे एम-पासपोर्ट पोलीस ॲप नऊ हजार पोलीस ठाण्यांमध्ये सुरू करण्यात आले आहे.

## 'दिबां'ना अभिवादन



**पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते स्व. दि.बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त संग्राम निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेस माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. या वेळी 'दिबां'चे कुटुंबिय उपस्थित होते.**

## निवडक

### राज्यसभेच्या सभागृह नेतेपदी जे.पी. नड्डा यांची नियुक्ती

**नवी दिल्ली** : भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांची राज्यसभेच्या सभागृह नेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या पदावर यापूर्वी पियुष गोयल कार्यरत होते. गोयल लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यामुळे हे पद रिक्त झाले होते. आता त्या ठिकाणी नड्डा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय खासदार भर्तृहरी महताब यांची लोकसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली गेली आहे.

### झिम्बाब्वे दौऱ्यासाठी शुबमन गिलकडे भारतीय संघाची धुरा


**नवी दिल्ली** : झिम्बाब्वे दौऱ्यासाठी बीसीसीआयकडून भारतीय संघाची निवड करण्यात आली आहे. संघाची धुरा युवा शुबमन गिल याच्या खांद्यावर सोपवण्यात आली आहे. त्याचबरोबर सर्व वरिष्ठ खेळाडूंना विश्रांती देण्यात आली असून युवा खेळाडूंना स्थान देण्यात आले आहे. यामध्ये अभिषेक शर्मा, नितीश रेड्डी, तुषार देशपांडे, रियान पराग यांचा समावेश आहे. उभय देशांमध्ये ६ ते १४ जुलैदरम्यान पाच टी-२० सामन्यांची मालिका खेळली जाणार आहे.

### 'नीट' परीक्षा पेपरफुटी प्रकरण

## चौघांविरुद्ध गुन्हा दाखल, एकाला अटक

**धाराशिव : प्रतिनिधी**

राष्ट्रीय प्रवेश पात्रता परीक्षा (नीट) पेपरफुटीप्रकरणी आता नवीन खळबळजनक बाबी समोर येऊ लागल्या आहेत. नांदेड येथील दहशतवादीविरोधी पथकाने रविवारी लातूर येथील दोन जणांना ताब्यात घेतले होते. आता या प्रकरणी धाराशिव येथील धागेदोरे समोर आले आहेत. उमरगा शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील एका कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. त्याच्या माध्यमातून दिल्लीपर्यंत पैसे जात असल्याची माहिती आहे. त्यानुसार दिल्ली येथील एक जणासह एकूण चौघांविरुद्ध लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



उमरगा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक पदावर कार्यरत असणारा इरण्णा कोनकुलवार हा आरोपी नीट पेपरफुटीप्रकरणी समोर आला आहे. नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील मूळ रहिवाशी असलेला कोनकुलवार मागील वर्षभरापासून उमरगा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत आहे. यापूर्वी तो लातूर येथील महिला औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत होता.

पेपरफुटी प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणा (सीबीआय) सक्रिय झाली आहे. रविवारी लातूर येथील दोन शिक्षकांना नांदेडच्या एटीएस पथकाने ताब्यात घेतले होते. त्यामुळे या पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे धाराशिवमार्गे दिल्लीपर्यंत असल्याचा पुरावा समोर आला.

लातूर येथील शिक्षकांच्या मोबाईल आणि लॅपटॉपची झडती घेण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांचे हॉलतिकिट, काही संशयास्पद नोंदी आणि आर्थिक व्यवहाराच्या नोंदी आढळून आल्या. एटीएसने ताब्यात घेतलेले लातूरचे हे दोन्ही शिक्षक उमरगा येथे कार्यरत असलेल्या इराण्णा कोनगुलवार याच्या सतत संपर्कात असल्याचे समोर आले आहे. कोनगुलवार हा दिल्ली येथील एका व्यक्तीच्या संपर्कात होता. पैशाच्या व्यवहारात कोनगुलवार हाच मुख्य आरोपी असण्याची शक्यता आहे. लातूरच्या दोन्ही शिक्षकांनी पैशाच्या मोबदल्यात नीट परीक्षेत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी कोनगुलवार याच्यासोबत संधान साधले होते. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

**धाराशिवमार्गे दिल्लीपर्यंत धागेदोरे**

उमरगा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गटनिदेशक पदावर कार्यरत असणारा इरण्णा कोनकुलवार हा आरोपी दिल्ली येथील गंगाधर नावाच्या व्यक्तीसोबत नीट परीक्षेत प्रवेश मिळवून देण्यासाठी पैशाचे व्यवहार करीत होता. प्राथमिक माहितीनुसार लातूर ते दिल्ली व्हाया उमरगा असा हा नवीन गोंधळ पुढे आला आहे. कोनगुलवार यांच्याबाबत विचारणा केली असता शनिवार आणि रविवारी सुट्टी असल्याने ते संस्थेत आले नव्हते, तर सोमवार आणि मंगळवार अशी दोन दिवसांची रजा घेतली असल्याची माहिती समोर आली आहे.

## मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार पाऊस

### अनेक ठिकाणी साचले पाणी

**वाशिम : प्रतिनिधी**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यातील अनेक जिल्ह्यात जोरदार पावसाची हजेरी पहायला मिळत आहे. मराठवाड्यासह विदर्भाला पावसाने झोडपले. वाशिमच्या काकडदाती गावात मुसळधार पावसामुळे शेतीला तलावाचे स्वरूप आले आहे. परभणीच्या पूर्णा तालुक्यातील अनेक भागात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे शेतात पाणीच पाणी झाले आहे.



सलग चौथ्या दिवशी वाशिम जिल्ह्याच्या अनेक भागात जोरदार पावसाने हजेरी लावली. काकडदाती परिसरासह अनेक भागात मुसळधार पावसाने झोडपून काढले. या पावसामुळे शेतीला काही काळ तलावाचे स्वरूप आले होते, तर नाले ओसंडून वाहू लागले आहेत. नुकतेच खरिपाची पेरणी केलेले बियाणे पावसात वाहून गेल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले आहे. परभणीच्या पूर्णा तालुक्यात जोरदार पाऊस झाला. सर्वत्र शेतशिवारामध्ये पाणीच पाणी झाल्याचे चित्र दिसून आले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील करमाड, जयपूर, भाम्बर्डा, लाडगाव आणि कुंबेफळ यासह आसपासच्या परिसरात ढगफुटीसदृश्य पाऊस झाला आहे. त्यामुळे या शिवारातील असणारे छोटे-मोठे ओढे आणि नद्यांना पूर आला होता. याशिवाय शेतातही मोठे पाणी साचल्याचे पहायला मिळाले.



**सेंट लुसिया : टी-२० विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या सुपर ८ फेरीतील सामन्यात भारताचा कर्णधार रोहित शर्माने तडाखेबंद अर्धशतकी खेळी केली. त्याने ४१ चेंडूंत सात चौकार आणि आठ षटकारांसह ९२ धावा केल्या.**

# महायुतीचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांना वाढता पाठिंबा

### आणखी दोन संघटनांचे समर्थन; आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाचे भाजप महायुतीचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांना विविध संघटनांकडून पाठिंबा लाभत आहे. यात आणखी दोन संघटनांची भर पडली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग (जि.प., न.पा., मनपा) संघटना आणि महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेने आपले पाठिंबा पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत आमदार निरंजन डावखरे यांना रविवारी (दि. २३) दिले.





पनवेल मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पाठिंबा पत्रे सुपूर्द करतेवेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष वेणूनाथ कडू, परिषदेच्या प्राथमिक विभागाचे अध्यक्ष मधुकर उन्हाळे, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष फुलावरे, प्राथमिक शिक्षकांच्या पतपेढीचे अलिबाग अध्यक्ष निलेश घरत, संजय भगत यांच्यासह पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. कडू यांच्या माध्यमातून आमदार डावखरे यांना हे समर्थन देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग (जि.प., न.पा., मनपा) संघटनेने आमदार निरंजन डावखरे यांना दिलेल्या पाठिंबा पत्रात म्हटले आहे की, आपण यापूर्वी कोकण विभाग पदवीधर मतदारसंघावर निवडून गेलेले असून विधान परिषदेत पदवीधर शिक्षकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडून न्याय दिला होता. यंदाच्या निवडणुकीत आपण पुन्हा एकदा उमेदवारी लढवत आहात. यासाठी आम्ही आपणांस बिनशर्त पाठिंबा देत आहोत. कोकण विभागातील शिक्षक परिषद पदाधिकारी, हितचिंतकांना याद्वारे जाहीर आवाहन करण्यात येते की, आमदार निरंजन डावखरे यांना निवडून आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे. (पान २ वर..)

# अलिबागमध्ये नागरी समस्या; भाजपकडून आंदोलनाचा इशारा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरातील नागरी समस्याकडे लक्ष द्या अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्विकारा लागेल असा इशारा भाजपचे अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकीत बंगेरा यांनी दिला आहे. कचरा डेपो, डंपिंग ग्राऊंड, पाणी प्रश्न, गटारांची साफसफाई, सार्वजनिक शौचालयांची दुरावस्था याबाबत त्यांनी मुख्याधिकारी अस्थापनेतील कर्मचाऱ्यांना सोमवारी (दि. २४) निवेदन दिले.



शहरात गेल्या काही दिवसांपासून कचऱ्याचे ढीग सर्वत्र पडून आहे. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. अलिबाग शहराती डंपिग ग्राऊंण्डवरचा कचरा प्रक्रीया न करता कांदळवन क्षेत्रात ढकलला जात आहे. ज्यामुळे संरक्षित कांदळवनांचे मोठे नुकसान होत आहे. मोठा पाऊस झाला तर हा सर्व कचरा पुन्हा पाण्यासोबत शहरात पसरण्याची शक्यता आहे. बरेचदा हा कचरा जाळला जातो ज्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे घनकचऱ्याची शास्त्रशुध्द पध्दतीने व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पावसाळ्यापुर्वी शहरात नाले आणि गटारसफाई योग्य प्रकारे झालेली नाही. त्यामुळे पावसाळ्यात पाणी तुंबण्याची शक्यता आहे. त्यामुळे या गटारांची योग्य प्रकारे साफसफाई करावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. चेंढरे मारुती नाका ते अलिबाग नगर पालिका इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. अरुंद रस्त्यामुळे परिसरात मोठी गर्दी होत असते, त्यामुळे या मार्गाच्या रुंदीकरणासाठी प्रशासनाने पाऊले उचलण्याची मागणी भाजपने केली आहे.

या शिवाय शहरातील सार्वजनिक शौचालयांची अस्वच्छता आहे. या शौचालयांच्या स्वच्छतेसाठी मोठा निधी खर्च होत असला तरी शौचालयाची परिस्थिती दयनीय आहे. त्यासंदर्भात उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोळीवाड्यासह इतर भागात अपुरा पाणीपुरवठा होत असून पाण्याचे योग्य व्यवस्थापन होत नाही.

### मुख्याधिकारी आज भेटणार

*दरम्यान, भाजपच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांची निवेदन देण्यासाठी भेट मिळावी यासाठी सकाळपासून वेळ मागितली होती, मात्र दुपारपर्यंत त्या कामानिमित्ताने बाहेर असल्याचे सांगण्यात आले. अखेर त्यांच्या अनुपस्थितीत अस्थापनेतील कर्मचाऱ्यांना निवेदन देण्यात आले. मुख्याधिकारी यांनी भाजपच्या शिष्टमंडळाला मंगळवारी (दि. २५) भेटण्यासाठी बोलावले असल्याचे अंकीत बंगेरा यांनी सांगितले.*

ज्यामुळे पाणी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. त्यामुळे शहरात पुरेसा आणि शुध्द पाणीपुरवठा व्हावा यासाठी तत्काळ पाऊले उचलावीत अन्यथा आंदोलनात्मक पावित्रा उचलावा लागेल, असा इशारा ॲड. बंगेरा यांनी दिला आहे. या वेळी अशोक वारगे, निखिल चव्हाण, नितीन गुंड आदी उपस्थित होते.

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजना ऑनलाईन नोंदणीसाठी विशेष मोहीम

**पनवेल : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी १८ जून ते २ जुलै या कालावधीत ऑनलाईन लाभार्थी नोंदणीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या योजनेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती माता व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहित केले जात आहे. त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावी व जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचेही आरोग्य सुधारावे, मातामृत्यू व बालमृत्यू दरात घट होऊन तो नियंत्रित राहावा यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सुरू केलेली आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील पहिले अपत्य व दुसरे अपत्य मुलगी असलेल्या पात्र लाभार्थ्यांसाठी १८ जून ते २ जुलैपर्यंत ऑनलाइन फॉर्म भरून या योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना २.० राज्यात ९ ऑक्टोबर २०२३ लागू झाली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी महापालिका कार्यक्षेत्रातील आशा वर्कर व आरोग्य सेविकांमार्फत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ऑनलाईन नवीन लाभार्थी नोंदणी व पोस्टाचे इंडिया पोस्ट पेमेंट बैंक न (आयपीपीबी) खाते उघडणेबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील पात्र महिलांनी प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

### कोणाला दिला जातो लाभ?

या योजनेचा लाभ पहिल्या जिवंत अपत्यांसाठी पाच हजार रुपयांचा दोन टप्प्यात तसेच दुसरे अपत्य मुलगी जन्मल्यास सहा हजार रुपयांचा लाभ एकाच टप्प्यात थेट आधार लिंक व डीबीटी (एनपीसीआय) लिंक असलेल्या खात्यात जमा केली जाते. ही योजना शासकीय सेवेत, खासगी सेवेत किंवा ज्या मातेला सहा महिन्यांची प्रसूती रजा मंजूर आहे अशा माता वगळून इतर सर्व मातांना देय आहे.

### लाभासाठी हे आहेत निकष

✲ योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांच्या आत असावे. यासाठी तहसीलदारांचे उत्पन्न प्रमाणपत्र जोडावे लागेल. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या महिलांना जात प्रमाणपत्र जोडावे लागेल.

✲ दिव्यांग महिलांसाठी किमान ४० टक्के दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. बीपीएल शिधापत्रिकाधारकांसाठी त्यांच्या नावाचे रेशन कार्ड असणे आवश्यक आहे.

✲ आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थी ई–श्रम कार्ड धारण करणाऱ्या महिला, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी महिला शेतकरी, मनरेगा जॉब कार्ड घेतलेल्या महिला.

### जननी सुरक्षा योजना

ग्रामीण भागातील जेएसवाय (जननी सुरक्षा योजना) पात्र लाभार्थी जर शासकीय आरोग्य संस्था , मानांकित खाजगी आरोग्य संस्थेत प्रसुत झाली तर तिला प्रसुतीच्या तारखेनंतर सात दिवसाच्या आत ७०० रुपये लाभ बँक खात्यामध्ये परस्पर जमा होणाऱ्या धनादेशाद्वारे दिला जातो.

शहरी भागातील जेएसवाय पात्र लाभार्थी जर शासकीय आरोग्य संस्था / मानांकित खाजगी आरोग्य संस्थेत प्रसुत झाली तर तिला प्रसुतीच्या तारखेनंतर सात दिवसांच्या आत रुपये ६०० रुपये लाभ बँक खात्यामध्ये परस्पर जमा होणाऱ्या धनादेशाव्दारे दिला जातो.

ग्रामीण व शहरी भागातील फक्त दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील लाभार्थ्यांची प्रसुती घरी झाल्यास अशा लाभार्थ्यांस ५०० रुपये लाभ प्रसुतीच्या तारखेनंतर सात दिवसाच्या आत बँक खात्यामध्ये परस्पर जमा होणाऱ्या धनादेशाद्वारे दिला जातो.

जेएसवाय पात्र लाभार्थीची सिझेरियन शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्यास लाभार्थीस रुपये १५०० लाभ बँक खात्यामध्ये परस्पर जमा होणाऱ्या धनादेशाव्दारे दिला जातो.

# पदवीधर, शिक्षक मतदारसंघाच्या मतदानाकरिता पर्यायी कागदपत्रे ग्राह्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण विभाग पदवीधर मतदार संघाची निवडणूक मतदारांनी त्यांची ओळख पटवून देण्यासाठी निवडणूक आयोगाने निर्धारीत केलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही ओळखपत्र मतदान केंद्रावर सादर करता येईल, अशी माहिती सह. निवडणूक निर्णय अधिकारी अमोल यादव यांनी दिली आहे.

आधारकार्ड, वाहन चालक परवाना, पॅन कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), राज्य/केंद्र सरकारद्वारे त्यांच्या कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र उपक्रम, स्थानिक संस्था किंवा इतर खाजगी औद्योगिक घरे, खासदार/आमदार/एमएलसी यांना अधिकृत ओळखपत्रे जारी केली जातात.

ज्या शैक्षणिक संस्थांनी दिलेले सेवा ओळखपत्र संबंधित शिक्षक/पदवीधर मतदार संघात काम केले जाऊ शकते. विद्यापीठाने जारी केलेले पदवी/डिप्लोमाचे प्रमाणपत्र, मूळ स्वरूपात, सक्षम अधिकाऱ्याने जारी केलेले शारीरिक अपंगत्वाचे प्रमाणपत्र, वर युनिक डिसॅबिलिटी आयडी (UDID) कार्ड अशी कागदपत्रे पर्यायी कागदपत्रे पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येतील.

# कशेडी घाटात टेम्पो-टोईंग व्हॅनची धडक; दोघे जखमी

**पोलादपूर :** कशेडी घाटात इसुजू पिकअप टेम्पो व टोईंग व्हॅन यांची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दोघे जखमी झाले आहेत. पार्टेवाडी गावाच्या हद्दीत हा अपघात झाला.

डी मॅक्स गाडीवरील चालक अनिस हसन मिया जसनाईक (वय २७, रा. खेड) हा त्याच्या ताब्यातील इसुजु पिकअप टेम्पो महाड ते खेड असा जात असताना समोरून रत्नागिरी ते महाड येणारी टोईंग व्हॅनला ठोकर बसली. या वेळी इसूजू टेम्पो टोईंग व्हॅनच्या धडकेने रस्त्याच्या कडेला उलटला.

या अपघातात टोईंग व्हॅनवरील चालक रोशन अरविंद पांचाळ (वय २५, रा. अमरावती) इसूजु पिकअप टेम्पोच्या चालकासोबतचे प्रवासी हजरत हसनमिया जसनाईक (वय २९, रा.खेड) दोघे जखमी झाले.

# विकास घरत यांच्यामार्फत सोसायटी परिसराची स्वच्छता

**पनवेल : वार्ताहर**

कामोठेमधील गोकुळवन आणि वृंदावन या दोन सोसायटीच्या मागणीनुसार सोसायटीच्या आजूबाजूचा परिसर पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक विकास घरत यांनी स्वखर्चाने साफ करून दिला.



पावसाळ्यात उद्भवणारे आजार व रोगराई पसरू नये या हेतूने कामोठा येथील नगरसेवक विकास घरत यांच्या पुढाकाराने कामोठ्यात नेहमीच सामाजिक उपक्रम राबवले जातात. सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणारे घरत नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी कायम तत्पर असतात. कामोठकरांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अनेक ठिकाणी मोकळ्या भूखंडाचे सपाटीकरण आणि वृक्षारोपण घरत यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. या मोकळ्या भूखंडावर मोठ्या खड्ड्यामुळे पाणी साचले होते. त्यामुळे दलदल आणि घाणीचे साम्राज्य निर्माण झाले होते. या साठलेल्या पाण्यामुळे दाट झुडपेदेखील वाढली होती. या मोकळ्या जागेत मोठ्या संख्येने उंदिरानी बिळे तयार केली होती. अधून मधून साप दिसत होते. मच्छरांचे प्रमाण बेसुमार वाढले होते.

या सर्वांचा त्रास या रिकाम्या प्लॉटला लागून असलेल्या इमारतीमधील रहिवाशांना होत होता. मोकळ्या भूखंडावरील खड्ड्यामुळे आणि घाणीमुळे त्रासलेल्या रहिवाशांनी माजी नगरसेवक विकास घरत साफसफाईची मागणी केली होती. त्रासलेल्या रहिवाशांच्या मागणीला प्रतिसाद देऊन घाणीपासून सुटका केल्यामुळे या परिसरातील रहिवाश्यांनी समाधान व्यक्त करून विकास घरत यांचे आभार मानले.

# खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शनपर सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सेंटर फॉर करिअर गायडन्स अँड प्लेसमेंट सेलने सोमवारी (दि. २४) सन २०२३–२४ च्या तृतीय वर्षाच्या उत्तीर्ण विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते.



या करिअर मार्गदर्शनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून महाविद्यातील सर्व शाखेतील २०२३–२४ च्या तृतीय वर्षाच्या उत्तीर्ण विद्यार्थी व विद्यार्थिनींना मुलाखतींचे प्रकार, मुलाखतीतील बारकावे, वेगवेगळी तंत्रे तसेच व प्रश्न, मुलाखतीची तयारी कशी करावी या विषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सर्व शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी या सत्राचा लाभ घेतला.

या सत्राचे आयोजन प्रा. रेवन शिंदे समन्वयक सेंटर फॉर करिअर गायडन्स अँड प्लेसमेंट सेल यांनी केले तसेच , प्रा. महेश धायगुडे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. रूपाली नागरेकर, प्रा. योगिता पाटील व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असतात.

# इक्बाल काझी यांचा वाढदिवस बालग्राम आश्रमात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल एज्युकेशन सोसायटी (पीईएस) चे अध्यक्ष इक्बाल काझी यांचा वाढदिवस बालग्राम आश्रमात चिमुकल्यांसोबत साजरा करण्यात आला. त्यांनी आश्रमाची माहिती घेतली व मुलांची विचारपूस केली.



काझी यांनी आश्रमातील मुला मुलींना लागणारे गरजेचे साहित्य दिले. तसेच कपड्यांसाठी २१ हजार रुपये आर्थिक मदत दिली. छत्री, रेनकोट, फळे या वेळी देण्यात आले. यापुढे ही काही मदत लागण्यास सहकार्य करीन असे सांगितले. हा कार्यक्रम मानवी हक्क संरक्षण फेडरेशन तर्फे आयोजित करण्यात आला होता.

या वेळी फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी, राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. श्रेयस ठाकूर, उपाध्यक्ष पंकज शहा, आशिष मोहोकर, सूरज नागे, बालग्रामचे विनायक पाटील उपस्थित होते. फेडरेशनतर्फे इक्बाल काझी यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

# नवीन शेव्याला ३९ वर्षांनंतर मिळणार हक्काची जमीन

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील न्हावा शेवा बंदराच्या दुसऱ्या टप्प्यासाठी शेवा गावठाणाची जमीनसुद्धा लागेल असे सांगून शासनाने शेवा गावातील ग्रामस्थांना विस्थापित करून बोकडवीरा येथील जमिनीवर गेली ३९ वर्ष तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्यास ठेवले होते. एमआरपीटीपी ॲक्ट १९७६नुसार या विस्थापितांचे पुनर्वसन करणे गरजेचे होते, परंतु ३३ हेक्टरऐवजी फक्त १० हेक्टरवर तात्पुरत्या स्वरुपात वास्तव्यास ठेवले होते. गेली अनेक वर्षे गावकरी संघर्ष करून, आंदोलने करून आपला हक्क मांगत होते, परंतु गेल्या काही महिन्यांपासून गावातील ग्रामस्थांनी अथक प्रयत्न करून व सततचा पाठपुरावा करून शेवटी यश पदरी पाडले.

१ जुलै रोजी जेएनपीटी पुनर्वसित नवीन शेवा गावाची ३३.६४.०५ हेक्टर जमिनीची कायमहक्क मोजणी करण्यात येत असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# महापारेषणतर्फे रिक्त पदांसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाने अधिसूचित केलेल्या सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याकरीता तसेच वाढीव रिक्त पदांच्या भरतीकरीता महापारेषण कंपनीने यापूर्वी प्रसिध्द केलेल्या एकूण १३ पदांच्या जाहिराती सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाचा अंतर्भाव करून वाढीव रिक्त पदांसह पुनःश्च प्रसारित केल्या आहेत.

जाहिराती कंपनीच्या संकेतस्थळावर (www.mahatransco.in) उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सबब, इच्छूक उमेदवारांना कळविण्यात येते की, त्यांनी अधिसूचित पदांकरीता अर्ज करण्यासाठी कंपनीच्या संकेतस्थळाला भेट देऊन सविस्तर जाहिरात पहावी व आपली पात्रता पडताळणी करून अर्ज सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दुखवटा

### शकुंतला आठवले

**मुंबई :** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या भगिनी शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई (वय ७७) यांचे रविवारी (दि. २३) निधन झाले. सोमवारी सायंकाळी ६ वाजता चेंबूरच्या चरई स्मशानभुमीत दिवगंत शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांच्या पार्थिव देहावर बौध्द पध्दतीने अंत्यसंस्कार करण्यात आले.



### अंजली कांबळे

**पाली :** बौद्धजन पंचायत समिती शाखा शिहू या शाखेचे सभासद आणि पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे रायगड जिल्हाध्यक्ष सीताराम कांबळे यांच्या सुविद्य पत्नी निवृत्त मुख्याध्यापिका अंजली सीताराम कांबळे (वय ७४) यांचे शनिवारी (दि. २२) निधन झाले. त्यांच्या अंत्यविधी वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आदरांजली वाहिली. कै. अंजलीमाई यांचा जलदान विधी रविवारी (दि.३०)सकाळी ११ वाजता रविराज फार्महाऊस म्हाडा कॉलनी पेण याठिकाणी होणार आहे.



### अविनाश पडवळ

**मोहोपाडा :** रायगड जिल्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा सचिव अविनाश पडवळ यांचे (वय ४५) निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांच्या मातोश्री, भाऊ, पत्नी, दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे. कै.अविनाश पडवल यांचा दशक्रिया विधी २८ जून रोजी श्री क्षेत्र उध्दर रामेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य १ जुलै रोजी बारवई येथे होणार आहेत. यानिमित्ताने हभप संदीप महाराज यादव यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम होईल.



पान १ वरुन

# महायुतीचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांना वाढता पाठिंबा

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेने दिलेल्या पाठिंबा पत्रात नमूद केले आहे की, आपण आपले जुन्या पेन्शन लढासंदर्भातील प्राधान्य देण्याबाबतचे आश्वासन लक्षात घेता संघटनेच्या वतीने कोकण पदवीधर मतदारसंघामध्ये आपल्या उमेदवारीला सक्रिय पाठिंबा आणि समर्थन जाहीर करीत आहेत. संघटनेच्या शिलेदारांनी जुन्या पेन्शनच्या लढ्याला पाठबळ मिळण्यासाठी कोकण पदवीधर मतदारसंघातील उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांचा प्रचार आणि प्रसारासाठी सक्रिय राहावे.

# कामोठे येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात ‘दिबां’ची पुण्यतिथी

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयामध्ये लोकनेते दि. बा. पाटील यांची पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम झाला.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.टी. चाळके यांनी प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थी मनोगतातून गौरव पाटील, श्रेयस कदम, निकिता म्हेत्रे, आर्या भोसले या विद्यार्थ्यांनी दि. बा. पाटील यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. विद्यालयातील शिक्षक दीपक खुटले यांनी दि.बा.पाटील यांचे विचार आपले मनोगतातून मांडले. अध्यक्षीय भाषणातून चाळके यांनी प्रकल्पग्रस्तांचे कैवारी दि.बा. पाटील यांच्या संघर्षमय जीवनाची माहिती दिली. इयत्ता दहावी क मधील विशाल नवसाळे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. वर्गशिक्षिका थोरात यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.

## निवडक

### पनवेल येथील चर्चमध्ये चोरी

**पनवेल :** शहरातील लाईन आळी परिसरातील सेन्ट फ्रान्सीस न्यू चर्चमध्ये तीन दिवसांपूर्वी चोरी झाली. चर्चमधील कपाटातील पाच हजार रोख रकमेची चोरी झाल्याने भाविकांनी संताप व्यक्त केला. १९ ते २१ जून या दरम्यान ही चोरी झाली. याबाबत दोन दिवसांपूर्वी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चर्चच्या व्यवस्थापकांच्यावतीने तक्रार दिल्यानंतर पोलीसांनी परिसराची पाहणी केली. चोरट्यांनी चर्चच्या इमारती मागील दरवाजा तोडून चर्चमध्ये प्रवेश करुन ही चोरी केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

### तळोजा येथे 'निधी आपके निकट'

**नवी मुंबई :** निधी आपके निश्चत – २.०' भविष्य निर्वाह निधी सदस्य, नव्याने समाविष्ट संस्था आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी सुरू आहे. या वेळी, पीएफ खातेदार, नवीन समाविष्ट संस्था आणि पेन्शनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना, प्रादेशिक कार्यालय, वाशी यांनी २७ जून रोजी एकसाईड इंडस्ट्री तळोजा येथे निधी आपके निकट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
या महिन्याच्या २७ तारखेला 'निधी आपके निकल २.०' या कार्यक्रमात खातेदारांना त्यांच्या कामासाठी क्षेत्रीय कार्यालय, वाशी येथे यावे लागू नये यासाठी पीएफ, नव्याने समाविष्ट संस्था आणि पेन्शनशी संबंधित तक्रारी ऐकून घेतल्या जातील. याशिवाय, नवीन समाविष्ट आस्थापनांच्या नियुक्त्यांना पीएफ संबंधित मार्गदर्शनदेखील प्रदान केले जाणार आहे.

### पिरकोनमध्ये रोप लागवड

**उरण :** सदाबहार दोस्ती ग्रुप प्रतिष्ठान उरण आणि महाराष्ट्र गुन्हे तपास साप्ताहिकचे पत्रकारांतर्फे उरण तालुक्यातील पिरकोन येथील काशी डोंगरावर वृक्षलागवड कार्यक्रम झाला आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र गुन्हे तपास साप्ताहिकचे पत्रकार सदस्य आणि सदाबहार दोस्ती ग्रुपचे सर्व सदस्य तसेच सारडे विकास मंच आणि ऑक्सिजन पार्कचे निर्माते नागेंद्र म्हात्रे, पिरकोन गावचे निसर्गप्रेमी विनायक गावंड, नवघर गावचे गडप्रेमी गणेश भोईर, तसेच नंदाई प्रतिष्ठान वशेनीचे डॉ. हिराचंद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ उरण तालुका अध्यक्ष कैलास पाटील तसेच महाराष्ट्र गुन्हे तपास साप्ताहिकचे पत्रकार सदस्य तुकाराम गावंड, कामेश्वर म्हात्रे, संतोष जोशी, हरीचंद्र म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, सचिन पाटील, अरुण म्हात्रे, विजय गावंड या सर्वांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.





पनवेल : लोकनेते दि.बा. पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, वर्षा नाईक, भाजप महिला मोर्चा शहर उपाध्यक्ष अरुणा पाटील, तळेकर आदी उपस्थित होत्या.

# पोलीस भरतीसाठी पावसाच्या समस्येवर तोडगा

## रोडपाली मुख्यालयासमोरील काँक्रीटच्या रस्त्यावर धावपट्टी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई पोलीस दलातील १८५ पोलीस शिपाई पदांसाठीची भरती प्रक्रियेला रविवार पहाटेपासून सुरुवात झाली. पावसामुळे मैदानात धावण्याची परीक्षा घ्यावी कशी, असा प्रश्न उभा राहील्याने पोलीस आयुक्तांनी रोडपाली मुख्यालयासमोरील काँक्रीटच्या रस्त्यावर १६०० मीटर धावणीसाठी रस्त्यालाच धावपट्टी करून त्यावर तोडगा काढला. रविवारी पहाटे पाच वाजल्यापासून साडेतीनशे पोलिसांच्या बंदोबस्तामध्ये पोलीस भरतीला सुरुवात झाली. रोडपाली



(संग्रहीत छायाचित्र)

लिंकरोडवरील काँक्रीटच्या रस्त्यावर धावणी होणार असल्याने हा रस्ता वाहनांसाठी बंद करण्यात आला होता.

पावसाळ्यात मैदानात झालेल्या चिखलात १६०० मीटरसारखी धावण्याची परीक्षा घेण्याचे आव्हान नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्यासमोर होते. यावेळच्या भरती प्रक्रियेत ५,९८४ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. अर्जदारांमध्ये मोठ्या प्रमाणात उच्चशिक्षित व सुशिक्षित मुलांचा समावेश आहे. आधुनिक परिमापकांचा वापर करून उमेदवारांची उंची, वजन, छातीचे मोजमाप घेतल्यानंतर रविवारी पहिल्या दिवशी सातशे उमेदवारांची चाचणी घेण्यात आली.

बाहेरील जिल्ह्यातून येणाऱ्या उमेदवारांना राहण्याची, जेवणाची व चहापाण्याची सोय नवी मुंबई पोलीस दलाने केली होती. रविवारी पहाटे चार वाजल्यापासून पोलीस बंदोबस्त रोडपाली मुख्यालयासमोर तैनात करण्यात आला होता. उमेदवारांना भरती प्रक्रियेत कमीकमीत त्रास व्हावा असा विचार करुन पोलीस आयुक्त भारंबे, पोलीस उपायुक्त संजय पाटील यांनी नियोजन केल्याचे रविवारी दिसले. पुढील पाच दिवस भरती प्रक्रिया सुरू असल्याने रोडपाली लिंकरोडवरील वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे.

## आगरी समाजातर्फे 'दिबां'ना आदरांजली







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील यांच्या अकराव्या स्मृतीदिनानिमीत्त आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील सभागृहात अखिल आगरी परिषद आणि आगरी समाज मंडळाच्या वतीने आदरांजलीच्या कार्यक्रमाचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन लोकनेते दि.बा. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, नितीन पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, जे.डी. तांडेल यांच्यासह अनेक मान्यवरांनीही लोकनेते दि.बा.पाटील यांना आदरांजली वाहिली.





**पनवेल : आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या दै. महाराष्ट्र टाइम्सच्या ६३वा वर्धापन दिनानिमित्तच्या समारंभाला आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी त्यांचे महाराष्ट्र टाइम्सच्या मुंबई आवृत्तीचे निवासी संपादक समीर कर्वे यांनी स्वागत केले. महाराष्ट्र टाईम्सचे मेट्रो एडिटर प्रवीण मुळ्ये, प्रतिनिधी कुणाल लोंढे उपस्थित होते.**

## उलवे येथे मोफत आरोग्य शिबिर | लोकनेते 'दिबां'च्या स्मृतीदिनानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि. बा पाटील यांच्या स्मृतीदिनानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेलच्या वतीने उलवे सेक्टर १९ येथील भाजप कार्यालयात भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन सोमवारी (दि. २४) करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी यांनीही सदीच्छा भेट दिली. 'दिबां'ना अभिवादन करून त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. या वेळी वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, वहाळ गावप्रमुख प्रवीण ठाकूर, अभिमन्यू दापोलकर, हरी घरत, नीलेश खोत, अवधेश महतो, देवालय मित्रा, नीलेश खारकर, शैलेश भगत, धीरज ओवळेकर, प्रिया अडसूळ, निकिता खारकर, दीपक गोंधळी, नंदू ठाकुर, मनोज नाईक, गोपी भोईर, न्हावा सरपंच विजेंद्र पाटील, अमित नाईक, बाळकृष्ण कोळी, वनिता बाबर, छाया चौधरी आदी उपस्थित होते.

दरम्यान, शिबिरासाठी सहकार्य करणारे श्री सिद्धीविनायक हॉस्पिटलचे डॉ. राठोड, खुशी डेंटल केअरचे डॉ. बरून कुमार, उलवे आय क्लिनीकचे डॉ. चॅटर्जी आदी उपस्थित होते.









## सीकेटी महाविद्यालयातील कॅडेट्सचा एनसीसी प्रशिक्षण शिबिरात सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयातील सात कॅडेट्सनी ५ ते १४ जून २०२४ दरम्यान ठाकूर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, कांदिवली येथे आयोजित दहा दिवसीय संयुक्त वार्षिक प्रशिक्षण शिबिरात उत्साहाने सहभाग घेतला. हे शिबिर १ महाराष्ट्र नौदल एनसीसी युनिट मुंबई बी डिव्हिजनच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.

शिबिरामध्ये कॅडेट्सना विविध शारीरिक आणि मानसिक प्रशिक्षण कार्यक्रम, नौकानयन, ध्वज संचालन, शिस्तीचे धडे आणि नेतृत्व कौशल्ये शिकवली गेली. या शिबिराच्या माध्यमातून कॅडेट्सना अत्यंत मौल्यवान अनुभव मिळाला व त्यांच्यातील नेतृत्व गुण आणि शिस्तीची वाढ झाली. विशेष म्हणजे, कॅडेट हर्षाली शेळके यांनी जहाज मॉडेलिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला, याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. हर्षालीच्या या यशामुळे महाविद्यालयाचे नाव उज्वल झाले आहे. या शिबिराने कॅडेट्सना आपली क्षमता ओळखून अधिक सक्षम होण्याची प्रेरणा दिली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत होते व त्यांना भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज केले जाते. शिबिरामध्ये चांगु काना ठाकुर महाविद्यालयाचे डॉ. जितेंद्र पावरा, केअरटेकर ऑफिसरदेखील सहभागी झाले होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी शिबिरात सहभागी सर्व कॅडेट्सचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहित केले. कॅडेट्सनी तसेच पालकांनी १ महाराष्ट्र नौदल एनसीसी युनिटचे शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल आभार मानले.

## जासई हायस्कूलतर्फे लोकनेते दि.बा. पाटील यांना अभिवादन

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमार्फत स्व. लोकनेते दि.बा. पाटील यांच्या २४ जून या पुण्यतिथी दिनी अभिवादन करण्यात आले.

शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील यांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात दि.बा. पाटील साहेबांच्या पूर्णकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्याचबरोबर इतर मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या



प्रांगणात असलेल्या महापुरुषांच्या पुतळ्यास व हुतात्मा स्मारकास पुष्पहार अर्पण करून पूजन केले.

रयत शिक्षण संस्थेचे लाइफ वर्कर आणि विद्यालयाचे प्राचार्य श्री अरुण घाग, विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे, शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रा. अतुल पाटील, सरपंच संतोष घरत, विद्यालयाचे व्हाईस चेअरमन डी. आर. ठाकूर, यशवंत घरत, रघुनाथ ठाकूर, आदित्य घरत, बाबुराव मढवी, रमेश पाटील, सुभाष घरत, प्रकाश म्हात्रे, गिरीश म्हात्रे, माणिक म्हात्रे, अरुण म्हात्रे, टी. टी. घरत, वंदना म्हात्रे, पुष्पा म्हात्रे, तर नुकतेच विद्यालयातून सेवानिवृत्त झालेले ज्येष्ठ शिक्षक नुरा शेख आदी उपस्थित होते.



**पनवेल : शिवाजीनगर येथील भाजप ज्येष्ठ नेते शशिकांत ठाकूर यांच्या आई व युवा कार्यकर्ते सागर ठाकूर यांच्या आजी अनुसया गोवर्धन ठाकूर यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ठाकूर कुटुंबीयांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन केले व अनुसया ठाकूर यांना आदरांजली वाहिली. या वेळी ठाकूर परिवार उपस्थित होता.**

## संपादकीय


# पर्याय शोधायला हवा!

ज्या बिहारच्या जातगणनेचा दाखला दिला आणि तेथील जातसर्वेक्षणाचा मुद्दा मांडला जातो, त्या बिहार सरकारने सरकारी नोकरी आणि शिक्षणासाठी नव्या कायद्यान्वये ६५ टक्क्यांपर्यंत दिलेले आरक्षण पाटणा उच्च न्यायालयाने नुकतेच रद्दबातल ठरवले. आरक्षणाच्या मागण्या आणि त्याबाबतच्या घटनात्मक चौकटींमुळे असलेल्या मर्यादांची जाणीव समाजासह राज्यकर्त्यांनाही आहे. न्यायालयात असे निर्णय टिकत नाहीत हे मराठा आणि धनगर आरक्षणाबाबतच्या निर्णयातूनही स्पष्ट झालेले आहे.

**सामाजिक, आर्थिक समस्यांवर आरक्षण हाच एकमेव मार्ग आहे आणि आरक्षणाशिवाय सर्वांगीण प्रगती शक्यच नाही, अशी काहीतरी विचित्र भावना आपल्याकडे घट्ट झाली आहे. आरक्षणाच्या विषयात राजकीय फायदा उकळण्यासाठी स्पर्धाच लागलेली असते. आरक्षणाला पर्याय सापडत नसल्यानेच ही गुंतागुंत झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रासह देशात आरक्षणाच्या मुद्यावरून घुसळण होत आहे. लोकसभा निवडणुकीआधी मराठा आरक्षणाचा मुद्दा मनोज जरांगे-पाटील यांनी आक्रमकपणे मांडला. त्यावर पूर्णतः तोडगा निघालेला नसला तरी काही मागण्यांची पूर्तता झाली. अन्य बाबींच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न जारी आहेत. दुसरीकडे गेल्या दहा दिवसांपासून इतर मागासांच्या आरक्षणाला (ओबीसी) धक्का लावू नका, आमच्या ताटात वाटेकरी नकोत यासह चार प्रमुख मागण्यांकरता ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनाचे प्रा. लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी वडीगोद्री (जि. जालना) येथे बेमुदत उपोषण आरंभले होते. राज्य मंत्रिमंडळाच्या शिष्टमंडळाने सरकारच्या वतीने त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर ते स्थगित करण्यात आले. दोन मागण्या मान्य, दोन मागण्यांवर निर्णय न झाल्याने सरकार आंदोलनाबाबत काठावर पास झाल्याचा हाकेंचा दावा आहे. थोडक्यात, जरांगे-पाटील आणि प्रा. हाके दोघेही आपापल्या मागण्यांवर ठाम आहेत. परिणामी आगामी काळ सत्ताधाऱ्यांसाठी आणि समाजासाठीही कठीण परीक्षेचा असेल. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींच्या आरक्षणाला न्यायालयाच्या निर्णयाने ब्रेक लागला आहे. आता तोच मुद्दा आंदोलनाच्या निमित्ताने उपस्थित केला गेला. त्यावर पावसाळी अधिवेशनादरम्यान सर्वपक्षीय बैठकीद्वारे तोडग्याचे आश्वासन देण्यात आले. आंदोलन स्थगित झाले ही समाधानाची बाब. लोकसभेनंतर आता विधानसभा निवडणुकीचे बिगुल राज्यात वाजू लागले आहेत. निवडणुकीनिमित्ताने पुन्हा आरक्षणाच्या मागण्या धसास लागतीलच, परंतु त्या मांडताना समाजांमध्ये कटुता निर्माण होत आहे, ती चिंतेची बाब आहे. इथली सामाजिक वीण विस्कटता कामा नये याची काळजी सर्वच घटकांनी घ्यायला हवी. आरक्षणाच्या मागण्यांच्या मुळाशी गंभीर सामाजिक, आर्थिक प्रश्न आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या मराठा समाजाच्या जगण्याचे प्रश्न जटील झाले आहेत. बेभरवश्याची शेती, घटलेले शेतीउत्पन्न, शिक्षण, आरोग्याची हेळसांड आणि त्याच्या सामाजिक-आर्थिक परिणामातून आरक्षणाची मागणी धसास लावली जात आहे. दुसरीकडे व्यवसायाधारित जातवास्तव आणि आधुनिकीकरणाशी जमवून घेता न येणे यामुळे इतर मागासांचेही प्रश्न तितकेच जटिल झाले आहेत. आरक्षणाद्वारे मिळणाऱ्या नोकरीने किमान पोटापाण्याचे प्रश्न सुटतील या आशेने ते आंदोलनास प्रवृत्त होत आहेत, पण केवळ राजकारणाच्या दृष्टिकोनातून हाताळण्याचा हा विषय नाही. राजकीय पक्षांची धोरणे सत्तेच्या गणिताशी निगडित असतात. विरोधकांनी सर्वपक्षीय बैठकीची मागणी केली असली तरी त्यात अर्थ नाही. बैठकीत एक सूर आळवायचा व प्रत्यक्षात कृती त्याच्या विपरित करायची असे चित्र अनेकदा दिसते. सरकारी नोकरीपलीकडे रोजगाराच्या अन्य संधींची उपलब्धता, शिक्षण, आरोग्यासारख्या मूलभूत गरजांची पूर्तता आवश्यक आहे. हे आहे खरे आरक्षणाचे वास्तव.**

# पर्यावरणस्नेही जीवनशैलीतून अनोखी निर्मिती











**खबरबात**
**धम्मशील सावंत**

अलिबाग तालुक्यातील चौल येथील शैलेश राईलकर पर्यावरण स्नेही (इकोफ्रेंडली) जीवन पद्धती जगत आहेत. त्यांनी प्रयोग व शोध याद्वारे विविध इकोफ्रेंडली वस्तू तयार केल्या आहेत तसेच प्लास्टिकला पर्याय दिला आहे. नुकतेच त्यांनी केळीच्या झाडापासून दोर बनवले, ती डस्टबिन बॅगला राखेचा पर्याय देऊन जणू राखाडीची डास्टबिन बॅग बनवली आहे.

सतीश राईलकर विजेवर चालणारी कोणतीही यंत्रसामग्री न वापरता केळीच्या खोडापासून धागा निर्मिती करून त्यापासून दोरी बनवली आहे. यासाठी प्रथम केळीच्या खोडाचे काप केले. त्यानंतर त्या खोडाचे सर्व पापुद्रे वेगवेगळे करून या पापुद्र्यांवर दाब देऊन त्यातील रस पाणी काढून टाकाले. नंतर हे पापुद्रे दोरीवर उन्हात वाळत टाकून चांगले सुकवून घेतले. सुकल्यानंतर या धाग्याची वेणी करून त्याचा दोरखंड बनविला. असे दोरखंड ग्रामीण भागातील शेतकरी आणि बागायतदारांना वापरता येऊ शकतात. यापासून कलात्मक वस्तूंची निर्मितीही करता येऊ शकते. या दोरखंडांना चांगली मजबुती असते. भाताचे भारे बांधणे, गोणी बांधणे अशा प्रकारे याचा वापर करता येतो. घरच्या घरी अशा दोऱ्या बनविल्यास बाजारातील दोऱ्या विकत घेण्याचा खर्च वाचू शकतो.

ग्रामीण भागात कचऱ्याचे व्यवस्थापन कसे करता येईल या विषयावर काम करताना राईलकर यांना राखेच्या पिशवीचा शोध लागला. घरी आलेल्या प्लास्टिक पिशव्यांचे करायचे काय? जाळल्या तर हवा खराब होते. प्लास्टिकचे विघटन होत नसल्यामुळे मातीतही टाकता येत नाहीत. मग जाणीवपूर्वक वेगळ्या ठेवून त्या पुनर्निर्मितीसाठी पाठविणे हा एकच उपाय त्यांना सापडला. त्याचबरोबर प्लास्टिक पिशवीचा वापर कुठे कुठे टाळता येईल आणि त्यावर उपाय काय यावर विचार करता करता ही राखेची पिशवी बनविण्याचे त्यांना सुचले. ग्रामीण भागात बऱ्याचशा शेतकरी बागायतदारांकडे घराभोवताली स्वतःची पुरेशी जागा उपलब्ध असते. अशा ठिकाणी त्या शेतकऱ्याच्या घरात निर्माण होणारा ओला कचरा त्याच्याच जागेत जिरविता येऊ शकतो. अशा प्रकारे सार्वजनिक ठिकाणी टाकण्यात येणारा कचरा किंवा डम्पिंग ग्राउंडकडे जाणारा कचरा थोपाविता येऊ शकतो. कचरा डस्टबिनमध्ये टाकण्यासाठी बाजारात मिळणारी काळी प्लास्टिकची पिशवी टाळण्यासाठी ही राखेच्या पिशवीची कल्पना सुचली. त्याचबरोबर जमणाऱ्या इतर प्लास्टिकच्या पिशव्या जाणीवपूर्वक वेगळ्या ठेवून पुढे पुनर्निर्मितीसाठी पाठविता येऊ शकतात.

**मोठी समस्या**

प्रत्येकजण आपल्या घराच्या कचऱ्याच्या डब्यात काळी प्लास्टिकची पिशवी लावत असतो. आणि पिशवी सकट उचलून तो कचरा आपण घंटागाडीत टाकतो. त्यामुळे आपला कचऱ्याचा डबा स्वच्छ राहतो, खरा परंतु पर्यावरणामध्ये आपण एक प्लास्टिकची पिशवी रोज टाकत असतो. पुढे हा कचरा डम्पिंग ग्राउंडकडे जातो. डम्पिंग ग्राउंडमध्ये अशा लाखो पिशव्यांमधून कचरा आल्याने हा ओला कचरा सडू लागतो. यातील प्लास्टिक वेगळे करणे अशक्य असते. आणि कर्मचाऱ्यांच्या अजाणतेपणामुळे शेवटी हा कचरा जाळला जातो. अशा प्रकारे आपल्या देशातील हजारो लाखो डम्पिंग ग्राउंडमध्ये याच पद्धतीने कचरा जाळल्याने आपल्या आजूबाजूची एकंदरच पृथ्वीवरची शुद्ध हवा खराब होत चालली आहे. त्यामुळे या डस्टबिन बॅगला पर्यायस्नेही पर्याय देणे गरजेचे होते.

**मग याला पर्याय काय?**

यावर विचार करताना शैलेश राईलकर यांच्या असे लक्षात आले की जर डंपिंग ग्राउंडकडे जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करता आले आणि प्लास्टिकला वेगवेगळे पर्याय शोधता आले तर ही समस्या आपण काही अंशी कमी करू शकतो. आज ग्रामीण भागात बऱ्याच लोकांच्या घराच्या आजूबाजूला स्वतःची पुरेशी जागा उपलब्ध असते. या जागेत खड्डा करून ओला कचरा जिरवता येऊ शकतो. प्रत्येकाच्या घरीच जर प्लास्टिक जाणीवपूर्वक वेगळे ठेवले गेले तर ते डम्पिंग ग्राउंड कडे जाणारच नाही. असे जमणारे प्लास्टिक पुनर्निर्मितीसाठी पाठवायला आज अनेक संस्था काम करीत आहेत. राईलकर यांनी अशी परिस्थिती निर्माण केली आहे की घंटागाडीला द्यायला कचराच नाही, कारण ते ओला कचरा त्यांच्याच जागेत जिरवतात. सर्व प्रकारचे प्लास्टिक पुनर्निर्मितीसाठी पाठवितात. राखेची कचरा पिशवी हा त्याचाच एक भाग आहे. असे राईलकर म्हणाले.

**अशी बनते राखेची डस्टबिन बॅग**

कचऱ्याची बादली ओलसर करून त्यात राख आतून सर्वत्र लावावे. ज्यामुळे त्याला एक प्रकारचे राखेचे कोटिंग तयार होते. म्हणजे एक प्रकारे ही कचरा बादलीत लावण्याची पिशवीच तयार होते. यातील कचरा घंटागाडीत देता येतो किंवा जवळच्या खड्ड्यात टाकता येतो. यामुळे प्लास्टिक थैली टाळली जाते. ही राख स्वतःच्या घरातील चुलीमधून गावातील इतर ठिकाणावरून आणली जाते व साठवली जाते गरजेनुसार तिचा वापर केला जातो.

**व्यवस्थापन**

कचरा काय पद्धतीचा आहे त्यावर सारे अवलंबून आहे. जेव्हा जास्त ओला कचरा असेल तेव्हा धुतलेली चांगली. अन्यथा प्रत्येक वेळी धुवायलाच हवी असे नाही. इथे पाण्याचीही बचत करायला हवी. कचरा पिशवीला पर्याय म्हणून राखेची पिशवी म्हटल्यामुळे लोक त्याचा वापर करतील. कचऱ्याची बादली भरेपर्यंत. प्रत्येकाकडे बादलीची साईज वेगवेगळी असू शकते. प्रत्येकाकडे कचरा निर्माण होण्याचे प्रमाणही वेगवेगळे असू शकते. कोणाची एक दिवसात तर कोणाची कचरा बादली भरायला चार दिवसही लागतील. बादली भरेपर्यंत राख चिकटलेली राहते. बादली मोठी असेल तर थोडा थोडा कचरा टाकल्यावर प्रत्येक वेळी त्याला राखीने झाकता येते. पिशवीप्रमाणेच कचऱ्यावर झाकण म्हणूनही राखेचा उपयोग होतो.



## बदलते तंत्रज्ञान

# शाळकरी अन् कॉलेजच्या मुलांसाठी 'ॲपल'चा सेल




ॲपल कंपनीचे प्रॉडक्ट्स तरुण मंडळींना नेहमीच आकर्षित करतात. इतर कंपन्यांच्या तुलनेत जरी हे प्रॉडक्ट्स महाग असले तरी त्यामधील फीचर्सही जबरदस्त असतात. तर हे लक्षात घेता ॲपल कंपनी कॉलेज आणि विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षकांसाठी 'बॅक टू स्कूल' ऑफर घेऊन आली आहे. १५ जून २०२४पासून शाळकरी व विद्यापीठीय विद्यार्थ्यांचे शाळा, कॉलेजेस सुरू झाली आहेत. त्यामुळे कंपनी काही प्रॉडक्ट्सवर सूट देते आहे आणि ही ऑफर बीकेसी ॲपल स्टोअर्स, ॲपल स्टोअर ऑनलाइन २० जून ते ३० सप्टेंबरदरम्यान उपलब्ध असणार आहे.

'बॅक टू स्कूल'मध्ये ॲपल कंपनी मॅक आणि आयपॅड्स ग्राहकांना खरेदी करण्यास अनुमती देते आहे. त्याव्यतिरिक्त जे मॅक खरेदी करतात, त्यांना एअरपॉड, तर जे आयपॅड खरेदी करतात, त्यांना ॲपल पेन्सिल मोफत देण्यात येणार आहे तसेच ग्राहकांना appleCare Plus वर २० टक्के सूट देण्यात येईल. त्यांची उपकरणे संरक्षित असल्याची खात्री करून त्याचबरोबर कंपनी ॲपल म्युझिक आणि ॲपल टीव्ही प्लसवर तीन महिने मोफत सबस्क्रिप्शन देते आहे तसेच तीन महिन्यांनंतर विद्यार्थी दरमहा ५९ रुपयांच्या सवलतीच्या दराने त्यांचे सबस्क्रिप्शन सुरू ठेवू शकतात.

ऑफर मॅकबुक एअर, मॅकबुक प्रो, आयमॅक, मॅक मिनी, आयपॅड एअर व आयपॅड प्रो यांसह ॲपल उत्पादनांवर लागू होते. ॲपल पेन्सिल प्रो आणि मॅजिक की-बोर्डसारख्या ॲक्सेसरीज शैक्षणिक किमतीतदेखील उपलब्ध आहेत. या ऑफरचा लाभ घेण्यासाठी कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी हे UNiDAYSद्वारे या ऑफरसाठी अर्ज करू शकतात, पण या ऑफर्सचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला व्हेरिफिकेशनही करावे लागेल.

# आद्य विनोदी लेखक श्रीपाद कोल्हटकर



**निमित्त**

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे मराठी मराठीतील आद्य विनोदी लेखक, नाटककार, कवी व समीक्षक होते. 'बहु असोत सुंदर, संपन्न की महा' या गीताचे रचनाकार म्हणून ते सुपरिचित आहेत. त्यांचा जन्म बुलडाणा येथे झाला. हायस्कूलमध्ये असताना त्यांनी सुखा मलिका (सुखमालिका) नावाचे नाटक लिहिले. त्यांच्या हायस्कूलच्या काळात आणि नंतरच्या महाविद्यालयीन काळात त्यांनी इंग्रजी आणि मराठी दोन्ही साहित्याचे विशेषतः विष्णुशास्त्री कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालासह मोठ्या प्रमाणावर वाचन केले. त्यांच्या काळातील सामाजिक रितीरिवाजानुसार, कोल्हटकर यांच्या कुटुंबाने ते १४ वर्षांचे असताना त्यांचे लग्न लावून दिले. वयाच्या १७ व्या वर्षी त्यांनी हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले आणि १८९१मध्ये बॅचलर पदवी मिळविण्यासाठी पुण्यातील डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. १८९७मध्ये कायद्याची पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी अकोला आणि नंतर जळगाव जामोद येथे वकिली सुरू केली.

त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण अकोला येथे झाले. वडील अमरावती येथे शिक्षक होते. कोल्हटकरांना लहानपणापासून नाटकांची आवड होती आणि वडिलांमुळे त्यांना अनेक नाटके पाहता आली. दहाववीनंतर डेक्कन कॉलेज, पुणे येथे गेले. पुण्यात शिकत असतांना त्यांना शिवराम महादेव परांजपे, वि. का. राजवाडे, एस.एस. देव यांच्यासारखे शिक्षक लाभले. १८९१मध्ये कोल्हटकरांनी पहिल्यांदा संस्कृत नाटक मृच्छकटिकमध्ये अभिनय केला. तसेच शिकत असतांनच विक्रम शशिकला या नाटकावर कोल्हटकर यांनी लिहिलेली समीक्षा विविधज्ञानविस्तारमध्ये प्रसिद्ध झाली होती. १८८७ साली कोल्हटकरांनी एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले व ते अकोला येथे आपला व्यवसाय करू लागले. १९०१ साली कोल्हटकर बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद येथे वास्तव्यास गेले.

कोल्हटकर हे मराठीतील विनोदाबरोबरच साहित्य समीक्षेच्या क्षेत्रातही अग्रणी होते. त्यांनी नरसिंह चिंतामण केळकर यांच्या तोतयाचे बंद (तोतयाचे बंड) या नाटकावर ११० पानांचे समीक्षण लिहिले, ज्यात नाटक लेखन कलेबद्दलचे त्यांचे विचार समाविष्ट होते आणि वामन मल्हार यांच्या रागिणी (रागिणी) या कादंबरीवर त्यांनी १३५ पानांचे समीक्षक लिहिले. जोशी, ज्यात कादंबरी लेखन कलेबद्दलचे त्यांचे विचार समाविष्ट होते. कोल्हटकरांनी १२ नाटकेही लिहिली. कविता, लघुकथा आणि कादंबऱ्यांतून वाचकांचे मनोरंजन करण्याबरोबरच सामाजिक सुधारणा हा कोल्हटकरांच्या लेखनाचा एक महत्त्वाचा उद्देश होता. राम गणेश गडकरी, विष्णू सखाराम खांडेकर, गजानन त्र्यंबक माडखोलकर, भार्गवराम विठ्ठल वरेरकर, प्रल्हाद केशव अत्रे या लेखकांनी त्यांचा गुरू म्हणून गौरव केला. १९१३मध्ये पुण्यात झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

कोल्हटकर पुणे येथील दुसऱ्या कविता संमेलनाचे आणि पुणे येथे १९२७ साली भरलेल्या १३व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. मराठी लेखक गंगाधर देवराव खानोलकर यांनी कोल्हटकरांचे चरित्र लिहिले आहे. याखेरीज खानोलकरांनी कोल्हटकरांच्या संकलित लेखांचा कोल्हटकर लेखसंग्रह या नावाचा संग्रहग्रंथही संपादला आहे. कृष्ण श्रीनिवास अर्जुनवाडकर यांनी श्रीकृंवर 'श्री.कृ. कोल्हटकर : व्यक्तिदर्शन' नावाचे समीक्षात्मक पुस्तक लिहिले आहे. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**



जुन्नर : छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी किल्ल्याचे पावसाळ्यातील मनमोहक दृश्य.

## आरोग्य प्रहर

# शरीरात शांतपणे पसरतो 'हा' प्राणघातक कर्करोग



आरोग्यतज्ज्ञ सांगतात की, तुमचे आरोग्य तुमच्याच हातात आहे कारण आरोग्याची योग्य काळजी घेतली नाही, तर अनेक आजार तुमच्या शरीरात घर करतात. आरोग्य तज्ज्ञांनी अशाच एका कर्करोगाबद्दलही धोक्याचा इशारा दिलाय. अत्यंत शांतपणे पसरणाऱ्या एका प्राणघातक कर्करोगाबद्दल माहिती दिली असून त्याची लक्षणं तुम्हाला तर नाही ना? हे पाहणं अत्यंत गरजेचं आहे.

किडनी कर्करोग किंवा रेनल कर्करोग हा तुमच्या किडनीमध्ये होणारा गंभीर आजार आहे. यामध्ये मूत्रपिंडातील पेशी असामान्य वेगाने वाढू लागतात आणि ट्यूमरचे रूप धारण करतात. उपचार न केल्यास ते शरीराच्या इतर भागात पसरू शकतात. किडनीच्या कर्करोगाची लक्षणे कोणती आहेत? कोणत्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते? जाणून घ्या..

लघवीमध्ये रक्त असल्यामुळे लघवी गुलाबी किंवा लाल रंगाची असू शकते. पाठीच्या बाजूला किंवा खालच्या बाजूला दीर्घकालीन वेदना. ही वेदना बरगड्यांच्या अगदी खाली होते. अचानक वजन कमी होणे किंवा भूक न लागणे यासारख्या समस्यांकडे दुर्लक्ष करू नये. याव्यतिरिक्त, जर नेहमी थकवा जाणवणे किंवा बरे न वाटणे हे देखील मूत्रपिंडाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते. ओटीपोटात किंवा जवळ गाठ जाणवणे, वारंवार ताप, जो कोणत्याही संसर्गाशी संबंधित नाही. अशक्तपणा (लाल रक्तपेशी कमी होणे) आणि रक्तदाब वाढणे हे देखील मूत्रपिंडाचा कर्करोग सूचित करतात. रात्रीचा घाम येणे किंवा पायात सूज येणे ही देखील मूत्रपिंडाच्या कर्करोगाची लक्षणे असू शकतात.

किडनीचा कर्करोग प्रामुख्याने प्रौढांना होतो. त्याची मुख्य कारणे आपली जीवनशैली, पर्यावरण आणि आनुवंशिकता असू शकतात.त्याचा सर्वात मोठा धोका म्हणजे धूम्रपान. धूम्रपानातून बाहेर पडणारे विषारी पदार्थ किडनीमध्ये जमा होतात आणि पेशींमध्ये बदल घडवून आणतात. हे विष किडनीतून रक्ताद्वारे शरीराच्या इतर भागात पसरू शकतात.

# इमॅजिका ते पाली फाटा वाहतूक कोंडीची कटकट

**खोपोली : प्रतिनिधी**

पर्यटकांचा ठराविक वेळेत बाहेर पडणारा वाहनांचा लोंढा यामुळे पाली राज्य मार्गावर वाहतूक कोंडीची कटकट कायमची झाली प्रवाशांचे मात्र हाल होत आहेत. तालुक्यातील महत्त्वाचा मार्गपैकी खोपोली-पाली राज्य मार्गावर रुंदीकरण आणि कॉंक्रिटीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे.



तीर्थक्षेत्र पालीला जोडणारा हा राज्यमार्ग पुढे मुंबई गोवा राज्यमार्गालादेखील जोडला जात असल्याने या मार्गावर वाहनांची सातत्याने वर्दळ असते याशिवाय या मार्गावर छोटे-मोठे कारखान्यांची संख्यादेखील वाढत आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे थीम पार्क खालापूर तालुक्याचे हद्दीत आहे. थीम पार्कमध्ये दररोज शेकडोच्या संख्येने बस, कारमधून पर्यटक येतात. शनिवार, रविवार ही संख्या कित्येक पटीने वाढते. संध्याकाळच्या वेळेस पार्कमधून मोठ्या संख्येने बाहेर पडणाऱ्या वाहनांमुळे पाली फाटा ते इमॅजिका वाहतूक कोंडी समस्या उद्भवते. पाली फाटा या ठिकाणाहून मुंबई पुणे द्रुतगती मार्ग खोपोली पेण राज्यमार्ग, खोपोली-पुणे जुना मुंबई-पुणे मार्गावर जाता येत असल्याने या दिशेने जाणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड असते. एवढ्या मोठ्या प्रचंड संख्येने बाहेर पडणाऱ्या वाहनांना नियंत्रित करण्यास वाहतूक पोलिसांचीदेखील दमछाक होते. काही वेळा सामाजिक संस्थेचे तरुण या ठिकाणी मदती करता असतात, परंतु पार्कमधून बाहेर पडणारा वाहनावर नियंत्रण नसल्याने दोन ते तीन किलोमीटर प्रवासासाठी तासभरसुद्धा खर्ची पडत आहे.

पार्क व्यवस्थापनानेदेखील वाहतूक कोंडीच्या समस्येवर सामाजिक बांधिलकी म्हणून उपायोजना करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.

# कोयना प्रकल्पग्रस्त मागण्यांसाठी पावसाळी अधिवेशनात लक्ष वेधणार

**चौक : प्रतिनिधी**

कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या न्याय मागण्यांसंदर्भात अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघ २८ जून रोजी तालुक्याच्या ठिकाणी, तर २ जुलै रोजी पावसाळी अधिवेशनात विधिमंडळात दाद मागणार असल्याची माहिती अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाची वार्षिक बैठक खालापूर तालुक्यातील धवली या पाच गावात झाली, तर दुसरी बैठक पनवेल तालुक्यातील अकल्पे या गावी रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सातारा, सोलापूर जिल्ह्यातील कोयना प्रकल्पग्रस्त गावातील प्रकल्पग्रस्त खातेदार आणि त्यांच्या वारसांची झाली. त्या वेळी झालेल्या सभेत वरील निर्णय घेण्यात आल्याची माहिती अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी दिली.

गेली ६४ वर्ष कोयना प्रकल्पग्रस्त खातेदार अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाच्या माध्यमातून अतिशय शांत, सय्यमपुर्वक लोकशाही मार्गाने आपल्या मागण्या शासकीय दरबारी मांडत आहेत. यात रास्ता रोको आंदोलन, उपोषण, धरणे, बैठक, आंदोलन करण्यात आली. या प्रकल्पाच्या त्यावेळी पुनर्वसन कायदा अस्तित्वात नव्हता, पण राज्याचे हित, देशाचा विकास हा विचार करून गरीब, अशिक्षित शेतकरी तत्कालीन राजकीय नेते यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन आपले मुळ गाव सोडून रायगड, सातारा, रत्नागिरी, ठाणे, सोलापूर, पालघर या जिल्ह्यात विखुरल्याने आणि दळणवळण साधन नसल्याने कायमचे विखुरले गेले आणि त्याचाच गैरफायदा तत्कालीन प्रशासन आणि राज्यकर्ते यांनी घेतला आणि आजही आपल्या नागरी सुविधा, पर्यायी शेती जमीन, नोकरी, प्रकल्पग्रस्त दाखले यापासून दूर राहिले, असे संघाचे ज्येष्ठ सल्लागार पवनराव कदम यांनी सांगितले. येत्या २८ जून रोजी कोयना प्रकल्पग्रस्त गावातील तालुक्याच्या ठिकाणी दिवसभर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, तर २ जुलै रोजी कोकण भवन नवी मुंबई येथून लॉंग मार्च निघून पावसाळी अधिवेशनात विधीमंडळावर धडक देण्यात येईल, असे कार्याध्यक्ष अर्जुन कदम यांनी सांगितले.

या वेळी उपाध्यक्ष आनंद सकपाळ, ज्येष्ठ नेते बळीराम शिंदे,किसन जाधव, अशोक जाधव, सदानंद भातोसे, जीतू सकपाळ, जगदीश मरागजे, मारुती देवरे, सुरेश सकपाळ यांच्यासह प्रकल्पग्रस्त खातेदार उपस्थित होते.

# पतीच्या डोक्यात दगड टाकून हत्या करणारी पत्नी अटकेत

**खोपोली : प्रतिनिधी**

शिळफाटा परिसरातील मीळगाव नवीन वसाहतीत राहाणारा क्रेन ऑपरेटर अरसद अली (वय -३४) यांच्या डोक्यात दगड टाकून निर्घृण हत्या केल्याची घटना रविवारी घडली होती. गुन्ह्याची कबूली दिल्यानंतर आरोपी मुमीना अरसद अली (वय ३२) हिला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अरसद अली (वय २४) झोपेत असताना पत्नीने डोक्यात दगड टाकून निर्घृण हत्या केली.अरसद अलीची किंकाळीचा आवाज आल्यावर शेजारील लोक जागे होवून बाहेर आल्यावर पाहिले तर अरसदची पत्नी बाहेरील दरवाज्यात बसली होती. नवऱ्याला कोणी तरी मारून गेल्याचे भासवत खोटे नाटक तिने केले होते. यावेळी अरसदला जखमी असल्याची माहिती अपघातग्रस्त टिमचे गुरूनाथ साठेलकर यांनी मिळताच ते आपल्या टिमसह घटनास्थळी पोहचले.

घरात जावून पाहणी करताच अरसदच्या डोक्यात दगड टाकल्याने तो रक्ताच्या थरोळ्यात पाहिले. त्यानंतर गुरूनाथ साठेलकर यांनी सदर घटनेची माहिती खोपोली पोलीस ठाण्यात कळविताच घटनास्थळी सहाय्यक पोलीस निरिक्षक सुजित गडदे, उप पोलीस निरिक्षक अभिजित व्हरंबले पोलीस टिमसह घटनास्थळी पोहचून तपासकार्य सुरू केले. तपास करताना पत्नीची विचारपूस केली असता समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्यामुळे उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रम कदम यांनी तपास करीत श्वास पथकाला बोलावले.

श्वानाने सर्वत्र वास घेतल्यावर पत्नीजवळच जावू थाबंत असल्याने पोलिसांचा संशय बलावला होता. फॉरेन्सी लॅबच्या अधिकाऱ्यांनी घटनस्थळाची पहाणी करीत संशोयीत वस्तुची ठसे घेतले आहे. एलसीबीच्या अधिकाऱ्यांनी भेट देवू तपासकार्य केल्यावर संशयीत म्हणून मूमीना अरसद अली हिला पोलिसांनी ताब्यात घेतल्यावर कसून चौकशी केल्यानंतर तिने कबूल केल्यावर आरोपी मूमीना अरसद अलीविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# लांब पल्ल्याच्या रेल्वे डब्याचे स्थान चुकीचे दाखविल्याने प्रवासी हैराण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वेस्थानकात इंदिकेतरवर लांब पल्ल्यांच्या गाड्यांच्या आरक्षित डब्याचे स्थान चुकीचे दाखवत असल्यामुळे प्रवाशांना याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत तक्रार केल्यानंतर संबंधितावर रेल्वे प्रशासनाने दंड ठोठवला आहे.



काही दिवसांपूर्वी दौंड-पुणे-इंदोर या गाडीच्या कोचची स्थान चुकीचे दाखवत असल्यामुळे प्रवासांची खूप हाल झाले. कर्जत रेल्वेस्थानकावर बसविण्यात आलेल्या छोट्या इंडिकेटरवर दौंड पुणे इंदोर या गाडीचा जनरल डबा असे दर्शविण्यात आल्यानंतर त्या जागी एस - ७ हा डबा आल्यामुळे प्रवाशांची खूप धावपळ झाली.

कर्जत रेल्वेस्थानकात दौंड पुणे इंदोर या गाडीने प्रवास करणारे प्रवासी, कर्जत रेल्वेस्थानकावर लावण्यात आलेल्या छोट्या इंडिकेटर प्रमाणे आपल्या आरक्षित डब्या समोर उभे राहिले होते, परंतु दौंड पुणे इंदोर ही गाडी कर्जत आल्यानंतर इंडिकेटरवर चुकीचे डबे दर्शविले असल्याने स्थानकावर उभे असलेले प्रवासीची खूप धावपळ झाली.

## संबंधितावर ठोठावला दंड

या धावपळीत काही प्रवाशांना समान नेताना खूप त्रास झाला तर काहींच्या बरोबर लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक असल्याने त्यांनाही आपल्या डब्या जवळ जाताना मनस्ताप सहन करावा लागला. असे नेहमीच होत असेल तर समान किंवा सह प्रवासी स्थानकात राहू शकतात. तसेच धावपळीत अपघात होण्याची शक्यता आहे.

पीडित प्रवाशांनी रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडविणारे पंकज मांगीलाल ओसवाल यांच्या निदर्शनात ही बाब आणून दिली. ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर याबाबतीत रेल्वे प्रशासनाने अधिक चौकशी केली असता रेल्वे प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी केली असता ज्या

**इंडिकेटरवर ट्रेनचे कोच ची माहिती चुकीची असल्यामुळे एखादा अपघात होऊ शकतो. तरी याबाबतीत रेल्वे प्रशासनाने याबाबतीत अशी चूक परत न होण्यासाठी ठोस उपाययोजना करावी ही नम्र विनंती.**
**-पंकज ओसवाल, कर्जत**

ठेकेदार उद्घोषक कर्मचाऱ्याने या ट्रेनच्या डब्याचे स्थान चुकीचे दाखविल्याचे आढळून आल्यानंतर त्या ठेकेदार कराराच्या अटींनुसार लागू होणारा दंड आणि संबंधित कर्मचाऱ्यांना अधिक सतर्क राहून कर्तव्य काळजीपूर्वक पार पाडण्यासाठी समज देण्यात आली. असे रेल्वे प्रशासनाने ओसवाल यांना लेखी स्वरुपात कळविले आहे.

# चित्रकार मानसी सुळे यांना पुरस्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतची नवोदित चित्रकार मानसी प्रकाश सुळे हिला आर्टस् बिटस् फाऊंडेशन पुणे यांचा 'महाराष्ट्र कला सन्मान पुरस्कार २०२४' जाहीर झाला आहे.



गेल्या आठ वर्षांपासून म्हणजेच २०१६ पासून सणउत्सवासाठी, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी तसेच गणपती आरास, दिवाळी कंदील अशा कलाकुसरीच्या विविध वस्तु बनवण्याचे काम मानसी कडून सुरू आहे पर्यावरणप्रेमी असणाऱ्या मानसीने पर्यावरणास हानिकारक ठरणाऱ्या वस्तुंचे नविनीकरण करून त्यातुन विविध कलाकुसरीच्या, शोभेच्या आणि उपयोगात येणाऱ्या वस्तुंवर भर दिला. पहिल्यापासून क्रीएटीव्ह जगात काहीतरी करण्याच स्वप्न बघणाऱ्या मानसी हीने चित्र आणि वस्तु या दोन्हींमध्ये आपले काम करण्यास सुरूवात केली. हे करत असताना पारंपरिक तसेच लोककला म्हणजेच फोल्प आर्ट ते मॉडर्न आर्ट या कलेतील विविध अंगाचा वैविध्यरित्या वापर करून योगदान देण्याचा प्रयत्न केला.

हे करत असताना नुकतेच मुंबई तील जहांगीर आर्ट गॅलरी बाहेरील आर्ट प्लाझा येथे मानसी सुळे यांचे यशस्वी चित्र प्रदर्शन झाले. एक दिवस याच जहांगीर आर्ट गॅलरीमधील आतील कलादालनात आपल्या चित्रांचे प्रदर्शन असे स्वप्न मानसीचे आहे. अशा या नवोदित कलाकाराला आर्टस् बिटस् फाऊंडेशन, पुणे यांचा 'महाराष्ट्र कला सन्मान पुरस्कार '२०२४' जाहीर झाला आहे.

# कोकणातून दिंड्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान

**चौक : प्रतिनिधी**

आषाढी एकादशी निमित्त पंढरपुरी जाण्यासाठी राज्यातून अनेक वारकरी दिंड्यांचे प्रस्थान पंढरपूरकडे सुरू झाले आहे. आज रायगड जिल्ह्यातील पनवेल येथून कोकण दिंडीचे प्रस्थान झाले आहे.



आषाढी एकादशी १७ जुलै २०२४ रोजी आहे. या दिवशी लाखो भाविक पंढरपूरकडे प्रस्थान करीत असतात. अनेक वारकरी दिंड्या यांचेही प्रस्थान पंढरपूर कडे होत असते. जुना मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार वरून पनवेल परिसरातील वारकरी दिंडीचे प्रस्थान झाले, प्रथम आळंदी येथे गेल्यावर माऊलींच्या दिंडीत सहभागी होऊन पंढरपूरकडे प्रस्थान होईल, असे दिंडीतील वारकरी यांनी सांगितले.

माऊलींच्या रथाच्या मागे १४ क्रमांकाची ही दिंडी आहे. जसजसे आषाढी एकादशी जवळ येईल तसे वारकरी दिंडीत सहभागी होतात. ऊन, पाऊस, वारा, थंडी यांची फिकीर न करता आपल्या परिवाराची काळजी न करता, पांडुरंगा कडे सर्व सुपूर्द करून विठू माउलीच्या नामस्मरणात तल्लीन होऊन वारकरी महिला पुरुष यांना दर्शनाची ओढ लागून राहिली आहे.

# जिविता मिणमिणे यांची नियुक्ती

**मुरूड : प्रतिनिधी**

शिवसेनेचे धडाडीचे व कार्यतत्पर मुरूड तालुका संघटक दिनेश मिणमिणे यांच्या पत्नी जिविता मिणमिणे यांची राजपुरी जिल्हा परिषद मतदार संघाच्या महिला विभाग संपर्क प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे मिणमिणे समर्थक आनंदी झाले आहेत. दिनेश मिणमिणे हे आमदार महेंद्र दळवी यांचे कट्टर समर्थक आहेत.

माळी समाज गृह येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात होते त्यावेळी शिवसेनेच्या महिला आघाडी प्रमुख व रायगड जिल्हा परिषद सदस्या मानसी दळवी यांच्या हस्ते त्यांना हे नियुक्तीपत्र देण्यात आले. मुरूड तालुक्यात दोन जिल्हा परिषद निवडून येत असतात. राजपुरी जिल्हा परिषद मतदार संघात शिवसेना अधिक बळकट करण्यासाठी मिनमिणे यांची निवड करण्यात आली आहे.



# अलिबागमधील कलाकारांचा 'कर्मयोग'

## चित्रपट महोत्सवात पाठविण्याचा मानस

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमधील स्थानिक कलाकारांनी तयार केलेला कर्मयोग हा लघुपट चित्रपट महोत्सवात पाठविण्याचा मानस असल्याची माहिती या लघुपटाचे निर्माता डॉ. आशिष शेटे यांनी दिली.



आपण जे कर्म करतो,त्याचे फळ आपल्याला मिळते. त्यासाठी कर्म कोणते त्यावर त्याची फलश्रुती अवलंबून असते. चांगले कर्म करा..फळ चांगलेच मिळते .हा संदेश देणारा श्रीकांत कवळे लिखित आणि प्रदीप मेस्त्री दिग्दर्शित कर्मयोग या लघुपटाचा प्रीमियर शो कुरूळ - अलिबाग येथील सुरुची रिसॉर्ट मध्ये शनिवारी (दि. २३ ) झाला. त्यावेळी डॉ. आशिष शेटे यांनी ही माहिती दिली. या प्रीमियर शो साठी सामाजिक,राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

महसूल खात्यात ३० वर्षांहून अधिक काळ नोकरी केल्यानंतर श्रीकांत पांडुरंग कवळे यांनी एक कथा लिहिली. त्या कथेचा चित्रपट किंवा लघुपट व्हावा अशी त्यांची इच्छा होती. योगायोगाने किहीम येथील निसर्गोपचार करणारे डॉ. आशिष शेटे यांच्याशी त्यांचा परिचय झाला. डॉ.शेटे यांनादेखील निर्मिती क्षेत्रात उतरायचे होते. त्यांनी श्री कवळे यांची कथा ऐकून निर्माता म्हणून होकार दिला. मुंबईतील दिग्दर्शक प्रदीप मेस्त्री यांच्या बरोबर राजेंद्र नर्बेकर यांच्या माध्यमातून परिचय झाला होता. राजेंद्र नरबेकर यांनी या पूर्वी मेत्री यांच्या सोबत एक प्रोजेक्ट केला होता. राजेंद्र यांनी निर्मिती सूत्रधार म्हणून जबाबदारी घेतली.

राजेश भोसले, प्रियांका मुणगेकर, हरी ठमके, ज्योती राऊळ, ऋतुजा वाडकर,राजेन्द्र नरबेकर, डॉ. आशिष शेटे, नरेश नारकर, श्रीकांत कवळे, बाल कलाकार आराध्या नरबेकर, हृदया मेस्त्री यांनी आपापल्या भूमिका उत्तमपणे साकारल्या आहेत. या लघुपटात काम करणारे मोजकेच कलाकार व्यावसायिक रंगभूमीवर काम करणारे आहेत. उर्वरित सर्व कलाकार हे अलिबाग तालुक्यातील कलाकार आहेत. त्यातील डॉ. आशिष शेटे, राजेंद्र नरबेकर, बाल कलाकार आराध्य नरबेकर यांनी यापूर्वी एका लघुपटात एकत्र काम केले आहे.

लघुपट प्रदर्शित झाल्या नंतर उपस्थित मान्यवरांनी चित्रपटा बाबत आपली प्रतिक्रिया नोंदवली. या मध्ये राजाभाऊ ठाकूर, कैलास पिंगळे, ब्रह्मा - विष्णू. - महेश चित्र मंदिराचे मालक गजानन दळी, द्वारकानाथ नाईक, आल्हाद पाटील, चिंतामणी मकू, अर्जुन गवंड, अविनाश पाटील आदींनी आपली प्रतिक्रिया नोंदवताना लघुपटाची कथा, पटकथा, संवाद आणि अभिनय, दिग्दर्शन यांचे कौतुक केले. कथा लेखक श्रीकांत कवळे यांनीदेखील कथेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. गजानन दळी यांनी तर ह्या लघुपटालास एक स्क्रीन मोफत देण्याची घोषणा केली.

# 'दप्तरमुक्त शनिवार'द्वारे शाळांना आभासी भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

शासनाच्या नवीन धोरणानुसार दप्तरमुक्त शनिवार या उपक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा कशेणेमध्ये व्हॉट्सअॅप व व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून शाळांना भेट हा कार्यक्रम शनिवारी (दि.२२) राबविण्यात आला.

दप्तरमुक्त शनिवार अंतर्गत कशेणे शाळेने तालुक्यातील विघवली केंद्रातील निसर्गाच्या सानिध्ययात वसलेल्या व ऑक्सिजन पार्क असणाऱ्या राजिप शाळा कुशेडेला कशेणे शाळेतील विध्यार्थ्यांनी ऑनलाईन भेट दिली. या वेळी कुशेडे कशेणे शाळेतील विध्यार्थ्यांनी सुंदर पेंटिंग व बागबगीचा पाहिला तसेच कुशेडे शाळेतील मुलांसोबत छानसा सुसंवाद साधला. तेथील शिक्षक रजपुत मॅडम व म्हस्के सर यांना कशेणे शाळेतील विध्यार्थ्यांनी काही प्रश्न विचारले. कुशेडे शाळेतील मुलांनी बागेतील इतर सर्व झाडे दाखविली तर पहिलीतील मुलाने वाचन करून दाखविले.



**WANTED**

**REPUTED MNC REGD** - VRS, Retired, Housewife, Senior Citizen to start 2nd Inning Earn Rs 1 Lack + Foreign Tour + Medical.

**Call - Probir - 7045135872**
**Yogesh - 9820888267**

**नमुना एन. डी.**
(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH46 BQ 3228 चे मालक **सुधीर काळुराम बोरले** यांचे तारीख ३१/१०/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी **अश्विनी सुधीर बोरले,** पत्ता : रा. ठाणे न्हावे, पो. साजगाव, खालापूर, ठाणे न्हावे, जि. रायगड. महाराष्ट्र ४१०२०३ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - अश्विनी सुधीर बोरले,**
पत्ता : रा. ठाणे न्हावे, पो. साजगाव, खालापूर, ठाणे न्हावे, जि. रायगड. महाराष्ट्र ४१०२०३
दिनांक : २४/०६/२०२४

# घणसोलीत शाळेचे पटांगण पाण्यात!

## विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना तारेवरची कसरत

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घणसोली येथील नवी मुंबई मनपाच्या शाळेसमोर असलेले मोकळे पटांगण विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यासाठी डोकेदुखी ठरत आहे. पावसाळा सुरू झाला की, या पटांगनाला तलावाचे स्वरूप प्राप्त होत असून विद्यार्थ्यांना आपल्या वर्गात पोहचण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. विशेष म्हणजे याचा फटका चिमुकल्या विद्यार्थ्यांना मोठा बसत असून त्यांचा त्रास कमी व्हावा, म्हणून पालिकेने येथे उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे. माणूसकी या संस्थेचे अध्यक्ष सचिन शेलार यांनी केली आहे.

नवी मुंबईमधील घणसोली गावातील दत्त मंदिर शेजारी पालिकेची प्रशस्त शाळा क्रमांक ४२ आहे. या ठिकाणी बालवाडी ते इयत्ता आठवीचे एकूण तीन हजार दोनशे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामध्ये बालवाडी मध्ये दोनशे पन्नास विद्यार्थी आहेत. त्याच बरोबर पहिली व दुसरीचेदेखील शेकडो विद्यार्थी आहेत, परंतु पाऊस सुरू झाला की, या ठिकाणी पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचते. यामुळे



विद्यार्थ्यांना आपल्या वर्गापर्यंत पोहचतादेखील येत नसल्याची खंत पालकवर्ग व्यक्त करत आहेत.

पाऊस कधीही कोसळतो. त्याची खात्री नसते, परंतु योगायोगाने शाळा सुरू होण्याच्या वेळेत व सुटण्याच्या वेळेत सुरू झाली की, विद्यार्थ्यांची तारांबळ उडत असते. त्यामुळे पालकांना आपल्या पाल्याला पटांगनाच्या कोपऱ्या कोपऱ्यातून शाळेतून बाहेर किंवा शाळेच्या इमारतीपर्यंत पोहचावे लागत आहे. काही विद्यार्थी हे दत्त मंदिराच्या भिंतीवरून ये-जा करतात.

**घणसोली येथील विद्यार्थ्यांसाठी पावसाळ्यात ही परिस्थिती निर्माण होणे शहरासाठी अशोभनीय आहे. नवी मुंबई मनपाने त्वरित उपाययोजना करावी.**
**-संजय म्हात्रे, पालक, घणसोली**

**घणसोली विभाग अभियांत्रिकी विभागाकडून या पटांगणस्थळाची तातडीने पाहणी करावी. पटांगणात ठिकठिकाणी खड्डे असल्याने पाणी तुंबून राहते. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्रासाला सामोरे जावे लागते. यावर त्वरित उपाययोजना करावी.**
**-सचिन शेलार, घणसोली**

**पावसाळ्यात शाळेच्या पटांगणामध्ये पाणी तुंबते. म्हणून आम्ही पालिकेला कळविले आहे. या समस्यांवर उपाययोजना करावी, अशी मागणीदेखील केली आहे.**
**-संजय मोरे, मुख्याध्यापक**

**शाळेच्या पटांगनाची पाहणी करण्यात येईल. त्यानंतर पाणी साचू नये. म्हणून योग्य कार्यवाही करण्यात येईल.**
**-विजय राऊत,**
**कार्यकारी अभियंता, पालिका**

# पावसाअभावी टोमॅटोचे उत्पादन घटले

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या वर्षी टोमॅटोचे भाव गगनाला भिडले होते. जुलै ते ऑगस्टपर्यंत टोमॅटोने ग्राहकांना रडवले होते. यंदा ही तीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. घाऊक बाजारात टोमॅटो ५० ते ६० किलो रुपयांवर गेला आहे, तर मागच्या आठवड्यात ४० रुपये किलो टोमॅटो बाजारात विकला जात होता. एकीकडे भाजीपाला, कांदे बटाटे महाग झाले असताना आता टोमॅटोदेखील चांगलाच भाव खाऊ लागला आहे.

यंदा कडक उन्हाळ्याने सर्वांनाच भाजून काढले. पावसाची रिपरिप सुरू असली तरी सध्या उकाड्याने नागरीक हैराण आहेत. विविध राज्यातील अनेक शहरात तापमानाने कमाल पातळी ओलांडली आहे. त्याचा थेट परिणाम भाजीपाला आणि फळ पिकांवर पडलेला दिसून येतो तर अनेक भागात सुरुवातीला दमदार पाऊस झाल्यानंतर आता त्याने ओढ दिली आहे. त्यामुळे बाजारपेठेत भाज्यांची आवक रोडावली आहे. त्यामुळे भाजीपाल्याचा भाव कडाडले आहेत. किरकोळ बाजारात टोमॅटो ९० रुपयांच्या घरात पोहचला आहे.

**किरकोळ बाजारात भाव गेला ९० रुपयांवर**

प्रत्येक वर्षी पावसाळ्यात भाजीपाल्याच्या किंमतीत वाढ होते. जोरदार पाऊस अथवा कमी पावसाचा थेट परिणाम भाजीपाला उत्पादनावर दिसून येतो. देशभरात सध्या उन्हाचा कहर सुरू होता. भाजीपाला उत्पादन घटले आहे. तर ज्या भागात पाऊस पडला आहे. तिथे वाहतूक आणि साठवणीच्या अडचणीमुळे भाजीपाला सडण्याची भीती असते. त्याचा परिणाम भाजीपाल्यांच्या



किंमतींवर दिसून येतो.

गेल्या वर्षी टोमॅटोने शेतकऱ्यांना लखपती आणि करोडपती केले होते. यावर्षी टोमॅटो उत्पादनात अधिक शेतकरी उतरले आहेत. गेल्या वर्षीपेक्षा चार पट अधिक लागवड झाली आहे, पण उत्पादनाला पाऊस आणि उन्हाचा फटका बसला आहे. महाराष्ट्रातील अनेक भागात यंदा गेल्या वर्षीपेक्षा चार पट अधिक टोमॅटोची लागवड करण्यात आली, पण उन्हाळा आणि पावसाने ओढ दिल्याने उत्पादन मोठ्या प्रमाणात होऊ शकले नाही.

टोमॅटोच्या किंमतींमध्ये जनतेला कोणताच दिलासा मिळण्याची शक्यता नाही. मान्सूनमध्ये ग्राहकांच्या खिशावर ताण आल्या शिवाय राहत नाही. मान्सूनने डोळे वटारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मान्सूनला अजून उशीर झाल्यास खरीपाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होईल. भाजीपाल्याच्या किंमती वाढतील. किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर हवे तसे अकराले जात आहेत. कोणी ८० रुपये तर कोणी ९०-९५ रुपये आकारू लागले आहेत.

## निवडक



### वडाचे झाड लावून वटपौर्णिमा

**नवी मुंबई :** हिंदू संस्कृतीतील व्रतवैकल्ये, सण व आधुनिकता यांची सांगड घालून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणे गरजेचे आहे. एका वडाच्या झाडाची किंमत व ते लावण्यासाठी येणारा खर्च प्रत्येक महिलेने करावयाचा अशी ती संकल्पना होती व या संकल्पनेस आग्रोळीतील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या संकल्पनेनुसार वडाची २१ झाडे आणून ती वटपौर्णिमेच्या निमित्ताने लावण्याचा उपक्रम घेण्यात आला. वाढते प्रदूषण व वाढते तापमान याचा विचार करत यापुढे आम्ही दर वर्षी एक झाड लावू व अन्य ठिकाणीदेखील प्रत्येक वटपूर्णिमाच्या दिवशी महिलांनी अशा प्रकारे एक वडाचे झाड लावून वटपूर्णिमा साजरी करावी, असे विचार उपक्रमात सहभागी झालेल्या महिलांनी व्यक्त केले.

### प्रकाश गायकवाड यांना पुरस्कार



**मोहोपाडा :** टी.एम.जी.क्रिएशन प्रेजेन्ट तेरा सूर और मेरा गीत या सेकन्ड ग्रांन्ड म्युझिक लाईव्ह व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट सेवा करत असणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळा माटुंगा पुर्व येथील म्हैसूर एडोटेरीअम येथे झाला. डॉ. अमजद खान पठान, मोहन बडगुजर, झाकीर खान, एकनाथ खोलम, चिन्मई सुमित, वासूभाऊ बापट अश्या प्रसिध्द सिने कलाकार यांच्या हस्ते प्रदान झालेला गोल्डन सपोर्ट सोशल पुरस्कार रसायनीतील प्रकाश गायकवाड यांना देण्यात आला.

# बेलापूर येथील सोसायट्यांमध्ये २०० कापडी पिशव्यांचे वाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

एकल वापर प्लास्टिकची पर्यावरणाला व मानवी जीवनाला पोहोचणारी हानी नागरिकांच्या लक्षात आणून देत प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करावा याविषयी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई क्षेत्रात व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

याचाच एक भाग म्हणून अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व उपायुक्त सोमनाथ पोटरे आणि डॉ. अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली सेक्टर ११ बेलापूर येथील पुनीत टॉवरमध्ये



प्लास्टिक प्रतिबंधात्मक विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यामध्ये विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त ही शशिकांत तांडेल यांनी आपल्या सहकारी अधिकारी, कर्मचारी यांच्यासह सोसायटीतील

**प्लास्टिक प्रतिबंधात्मक जनजागृती विशेष मोहीम**

रहिवाशांशी संवाद साधला आणि प्लास्टिक पिशव्यांचा दैनंदिन जीवनातील वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करावा असे आवाहन केले व त्याची गरज स्पष्ट केली.

रविवार सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्याने मोठ्या प्रमाणावर रहिवाशांची भेट घेता आली व त्यांच्याशी संवाद साधता आला. 'वापर करा, स्वच्छ करा आणि परत करा' ही संकल्पना नजरेसमोर ठेवून सोसायटीमध्ये कापडी पिशवी बँकचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित सोसायटीतील सर्व रहिवाशांना सिंगल युज प्लास्टिकमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली तसेच 'माझी वसुंधरा अभियान' व 'सिंगल युज प्लास्टिक न वापराची सामूहिक शपथ ग्रहण करण्यात आली.

या वेळी उपस्थित सर्व रहिवाशांना व घरोघरी सर्वोदय बँक यांनी पुरस्कृत केलेल्या २०० कापडी पिशव्यांचे तेरणा इंजीनियरिंग कॉलेज नेरूळमधील एनएसएस विद्यार्थ्यांमार्फत करण्यात आले.

# लोकनेते स्व.दि.बा. पाटील यांना अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील भूमिपुत्रांचे कैवारी, प्रकल्पग्रस्तांचे जनक लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त सोमवारी (दि. २४) वाशीगाव मराठी शाळा येथे नवी मुंबई महापालिकेचे माजी



विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या माध्यमातून नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या वतीने युवा नेते निशांत भगत, सामाजिक कार्यकर्ते संदीप भगत यांच्या संयोजनाखाली वाशीगांव येथे ग्रामस्थ, विविध तरुण मंडळे व भूमिपुत्र माथाडी कामगार व जनरल कामगार युनियन, एकविरा चालक-मालक संघटना यांच्या सहभागातून सकाळी दि. बांच्या प्रतिमेचे पुजन व अभिवादन करण्यात आले.

दि. बा. च्या पुण्यतिथीनिमित्त नवीन मुंबई महापालिकेच्या वाशी प्रथम संदर्भ रुग्णालयाच्या स्व.मांसाहेब मीनाताई ठाकरे रक्तपेढी च्या सहकार्याने रक्तदान शिबिर, वाशी परिसरात स्वच्छतेत योगदान देणाऱ्या कचरावेचक भगिनींच्या मुलांना पावसाळ्यात उपयोगी म्हणून रेनकोट आणि त्या कचरा वेचक भगिनींना छत्र्या मदतीच्या स्वरूपात देण्याचा उपक्रम घेण्यात आला.

या उपक्रमास दि. बा. पाटील नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ नामकरण चळवळीतील नवीन मुंबई महापालिका क्षेत्रीय समन्वयक शैलेश घाग, साईनाथ पाटील, वाशीगाव ग्रामस्थ, भूमिपुत्र माथाडी कामगार युनियन, एकविरा रिक्षा युनियन, ईच्छापूर्ती सामाजिक विकास मंडळ व स्पोर्ट्स क्लब उपस्थित होते.

# शिंदेंकडील विभाग आता देशमुखांकडे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको महामंडळाच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाची सूत्रे गणेश देशमुख यांनी स्वीकारल्यामुळे तत्कालीन सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांच्याकडील असलेले सर्व विभाग देशमुख यांना सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक (एम.डी.) विजय सिंघल यांनी सोपवले आहेत.

सिडको महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी नवी मुंबई विमानतळ प्रकल्प वेळीच पुर्ण करण्यासाठी कंबर कसली आहे. महिन्यातून एक पाहणी दौरा विजय सिंघल हे करत असून ते विमानतळासाठी सुरू असलेल्या कामाचा नित्याने आढावा घेत आहेत. मार्च २०२५ पर्यंत विमानतळाचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण होईल असे सिडकोचे नियोजन आहे. विमानतळ प्रकल्पाचे काम यासह



व्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल यांच्या देखरेखीखाली सुरू आहे. तत्कालीन सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांच्या जागी देशमुख यांची नियुक्ती झाल्याने व्यवस्थापकीय संचालक सिंघल यांनी कोणताही बदल न करता देशमुख यांच्याकडे शिंदे यांच्याकडील सर्व विभागाची देखरेख करण्याची जबाबदारी दिली आहे.

देशमुख यांच्याकडे सिडकोच्या तीनही वसाहतींचा शहर सेवा विभागासोबत (एमटीएस १ ते ३ वसाहतींचा परिसर) तसेच भूमी व भूमापन विभाग, सिडकोचा सर्वात महत्वाचा वाणिज्यिक प्रकल्प पणन विभाग, सामाजिक सेवा विभाग, पुनर्वसन, आर्थिक व सांख्यिकी विभाग, विमानतळ व नवी मुंबईच्या विस्तारासाठी लागणारी भूसंपादन, पाणी पुरवठा, मलनिसारण (उदंचन केंद्र) यांच्या संदर्भातील प्रकल्प, पालघर नवीन शहर विकास प्रकल्प, नवी मुंबई सेझ, नवी मुंबई महापालिकेसोबत सिडको मंडळाचे समन्वयक, नगरविकास भवन, उलवे येथील युनिटी मॉलचा प्रकल्प, ठाणे ते नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाचा थेट मार्ग, मानखुर्द ते नवी मुंबई मेट्रो मार्गिकेचा प्रकल्प, या प्रकल्पांची मुख्यता जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच सरकारी संदर्भ तसेच संसदीय कार्य आधिवेशनातील प्रश्नांवर सिडकोची भूमिका स्पष्ट करण्याची महत्त्वाची जबाबदारी देशमुख यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

# चिरनेर शाळेतील दहावीच्या ग्रुपचे गेट टुगेदर

## वृक्षारोपणासह परिसर केला स्वच्छ

**उरण : बातमीदार**

सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपचे या वर्षीचे पावसाळी गेट टुगेदर रविवारी (दि. २३) बापूजी मंदिर चिरनेर परिसरात मोठ्या उत्साहात झाले. या ग्रुपकडून बापूजी मंदिर परिसरात आज आंबा आणि करंज रोपांची लागवड करण्यात आली.

नोकरीनिमित्ताने बाहेरगावी असलेले मित्र या वेळी आवर्जून उपस्थित होते. शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. बालपणीचा काळ सुखाचा होता असेही मत काहींनी व्यक्त केले. या ग्रुपमधील अनेकांनी अतिशय कठीण परिस्थितीत कष्ट करून शिक्षण घेतले.

ग्रुपकडून वृक्षारोपण करून इतर पर्यावरण प्रेमींनादेखील हा चांगला संदेश देण्यात आला.



त्याचबरोबर ही झाडे जगविण्यात येतील ही हमी त्यांनी दिली. पर्यटकांकडून या परिसरात प्लास्टिक बाटल्या आणि प्लास्टिक पिशव्या टाकल्या जातात. त्यादेखील उचलून या परिसराची साफसफाई करण्यात आली. यापुढील प्रत्येक गेट टू गेदर आणि सहलीत किमान एकतरी सामाजिक, शैक्षणिक आणि ऐतिहासिक उपक्रम राबवायचा असे ठरविण्यात आले. या ग्रुपकडून प्रत्येक सहलीत छत्रपती शिवाजी महाराजांचा एक किल्ला पाहिला जातो. आता येणाऱ्या सहलीत छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला पहायचे सर्वानुमते ठरवण्यात आले. या गेट टू गेदरला गृप ॲडमिन मिलिंद खारपाटील, चंद्रहास म्हात्रे, सुर्यकांत म्हात्रे, पद्माकर फोफेरकर, प्रकाश फोफेरकर, प्रकाश नारंगीकर, पंढरीनाथ नारंगीकर, सुरेश केणी, रोहिदास पाटील, सुभाष पाटील, दीपक म्हात्रे, राजेंद्र मुंबईकर, विजय पाटील, उपकार ठाकूर, प्रभाकर ठाकूर, रवींद्र पाटील, विजय मुंबईकर हे १७ वर्गमित्र उपस्थित होते. घरी परतताना सर्वांनी साश्रू नयनांनी एकमेकांचा निरोप घेऊन येत्या किल्ले शिवनेरी सहलीत सर्वांनी एकत्र भेटण्याचा निर्धार व्यक्त केला.

# दिघोडे शाळेतील नूतनीकृत वर्गखोल्यांचे उद्घाटन

**उरण : रामप्रहर वृत्त**

दिघोडे विभागीय संस्थेचे महात्मा गांधी विद्यालय, दिघोडे आणि स्वर्गीय रामदास नारायण ठाकूर कला उच्च माध्यमिक विद्यालय या शाळेची इमारत नादुरुस्त अवस्थेत गेली अनेक वर्षापासून होती. या इमारतीचे इंडियन ऑइल अदानी व्हेंचर्स लिमिटेड च्या सीएसआर फंडातून ३० लाख ९२ हजार रुपयांची तरतुद करून सात खोल्यांच्या दुरुस्तीचे आणि नुतनीकरणाचे काम करण्यात आले. या इमारतीचे उद्घाटन कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर कॅप्टन अनुभव जैन आणि कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या हस्ते सोमवारी (दि. २४) झाले.

हा कार्यक्रम संस्थेचे विद्यमान अध्यक्ष काशिनाथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या उदघाटनावेळी कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर कॅप्टन अनुभव जैन, चिफ फायनान्स ऑफिसर मनोज कुमार बोराड, सीओओ हेड अतुल खराटे, व्हाइस प्रेसिडेंट भूपेश शर्मा, एच आर हेड सतिश



देसाई, संस्थेचे उपाध्यक्ष नारायण कृष्णा पाटील, सचिव ज्ञानप्रकाश पाटील, शालेय समिती सभापती अविनाश पाटील, उपसभापती गणेश पाटील, दिघोडेच्या सरपंच किर्तिनिधी ठाकूर, धुतूमच्या सरपंच सुचिता प्रेमनाथ ठाकूर, चंद्रभागाताई पाटील, नाझनिन मॅडम, प्रफुल्ल म्हात्रे, संदीप काळे, प्राचार्य नाथा नारायण नाईक, मोकल सर, विद्यालयाचे पर्यवेक्षक पिंपरे सर, शिक्षक प्रतिनिधी वंदना बडगुजर, यांच्यासह शिक्षक आणि मान्यवर उपस्थित होते.

विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष परमानंद पाटील यांनी विद्यालयाच्या नुतनीकरणाच्या कामासाठी विशेष प्रयत्न केले.

# आमदार निरंजन डावखरेंना विजयी करा -मंत्री आदिती तटकरे

## नागोठणे येथील पदवीधर मेळाव्यात आवाहन

**नागोठणे : बातमीदार**

कोकण पदवीधर मतदारसंघ निवडणूक लढणे फार मोठे आव्हान आहे, परंतु आमदार निरंजन डावखरे यांनी हे आव्हान आपल्या बुद्धिमत्ता व प्रामाणिकपणाच्या जोरावर सतत १२ वर्ष यशस्वी पद्धतीने पेललेले आहे. आमदार डावखरे हे उच्चशिक्षित लोकांचे व शिक्षकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी तत्पर असतात हे मी स्वतः सभागृहात पाहिलेले आहे. त्यांना निवडून आणण्यासाठी भाजपपेक्षा एक टक्का अधिक जबाबदारी राष्ट्रवादीची राहील, असे उदगार राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी रविवारी (दि. २३) नागोठणे येथे काढले. खासदार सुनील तटकरे यांचा आशीर्वाद आमदार डावखरे यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

नागोठणे येथील टीएसके मंगलभवन (तुरे हॉल) येथे कोकण पदवीधर मतदारसंघांचे महायुतीचे उमेदवार आमदार निरंजन डावखरे यांच्या प्रचारार्थ पदवीधर मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी मंत्री तटकरे बोलत होत्या.

या मेळाव्यास आमदार रविशेठ पाटील, उमेदवार आमदार निरंजन डावखरे, भाजप जिल्हाध्यक्ष माजी





आमदार धैर्यशील पाटील, राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, सदानंद गायकर, शिवराम शिंदे, विलास चौलकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, श्रेया कुंटे, सोपान जांबेकर, मारुती देवरे, राजेश मपारा, सरचिटणीस गीता पालरेचा, मिलिंद पाटील, तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, नरेश कोकाटे, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, राष्ट्रवादी विभागीय अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, दादा घोसाळकर, अरिफ मनियार, जिल्हा सरचिटणीस आशा शिर्के, शहर अध्यक्ष सुजाता जवके, पळस सरपंच निष्ठा विचारे, वणी सरपंच प्रगती आवाद, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अपर्णा सुटे, प्रियांका पिंपळे, शेखर गोळे, सिराज पानसरे, सुभाष पाटील, राजेंद्र लवटे, राउफ कडवेकर, अशोक अहिरे, धनराज उमाळे आदींसह महायुतीचे कार्यकर्ते व मतदार उपस्थित होते.

आपल्या कोकणातील विद्यार्थी एमपीएससी व युपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन मोठ मोठे अधिकारी झाले पाहिजेत यासाठी कोकण पदवीधर मतदारसंघातील पाचही जिल्ह्यामध्ये अभ्यासासाठी विविध सुविधा उपलब्ध करण्यास आमदार निरंजन डावखरे विशेष प्रयत्नशील असल्याचा मला अभिमान आहे. आमदार डावखरे हे कोकण पदवीधर मतदारसंघात पहिल्या टर्ममध्ये राष्ट्रवादीचे आमदार होते. दुसऱ्या टर्ममध्ये भाजपचे आमदार आहेत तसेच तिसऱ्या टर्ममध्ये महायुतीचे आमदार होणार यात काडीमात्र शंका नाही, असा विश्वास मंत्री तटकरे यांनी व्यक्त केला.

उपस्थित मतदारांना मार्गदर्शन करताना आमदार निरंजन डावखरे यांनी, ही निवडणूक ईव्हीएमवर होणार नसून बॅलेट पेपरने होणार आहे. त्यामुळे आपण काळजीपूर्वक मतदान करा, असे सांगून मतदारांना मतदान प्रक्रिया समजावून सांगितली.

आमदार रविशेठ पाटील व जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी आमदार निरंजन डावखरे यांना निवडून देण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन मिलिंद पाटील यांनी केले, तर आभार सोपान जांबेकर यांनी मानले.

# पालीतील ब्रिटिशकालीन वास्तू ढासळतेय

## पावसामुळे भिंत कोसळली, दुर्घटनेचा धोका, रस्ता बंद

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

येथील रामआळीजवळ ब्रिटिशकालीन वास्तू आहे. येथे पोलीस स्थानक, तहसील व उपलेखा कार्यालय आणि न्यायालय होते. काही वर्षांपासून ही सर्व कार्यालये बंद करून दुसरीकडे हलविण्यात आली आहेत. सध्या या वस्तूची दुरवस्था झाली आहे. या वास्तूच्या रस्त्याच्या बाजूकडील भिंत नुकतीच पावसामुळे ढासळली आहे. सुदैवाने येथे कोणतीही दुर्घटना झाली नाही, मात्र या मार्गावरून प्रवास करणे आता धोकादायक झाले असल्याने नगरपंचायत मार्फत हा रस्ता बंद करण्यात आला आहे.



भिंत ढासळत असलेल्याचा व्हिडीओ येथील समाजमाध्यमांवरही फिरत आहे. त्यामुळे नागरिकांकडून चिंता व दुःख व्यक्त केले जात आहे. या ब्रिटिशकालीन वास्तूचे अक्षरशः खंडरमध्ये रूपांतर झाले आहे. येथील तुटलेल्या खोल्या आता मुताऱ्या झाल्या आहेत. तिथे अवैध धंदेदेखील सुरू असतात. चार वर्षांपूर्वी जुलै महिन्यात या वास्तूच्या रस्त्याच्या बाजूची भिंत कोसळली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अशाच प्रकारे ही जीर्ण वास्तू जर ढासळत राहिली, तर ती नामशेष होईल तसेच दुर्घटनाही घडू शकते.

### ऐतिहासिक महत्त्व

भोर संस्थानाचे संस्थानिक पंतसचिव यांच्याकडे या कार्यालयाची कारभार पाहण्याची जबाबदारी ब्रिटिशांनी दिली होती, असे इतिहास अभ्यासकांचे म्हणणे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते जवळपास २००२ ते २००३पर्यंत येथे कोर्ट आणि पोलीस ठाणे सुरू होते. त्या वेळी या वास्तूची योग्य देखभाल आणि देखरेख होत होती. त्यानंतर मात्र येथे कोणतेच सरकारी कार्यालय राहिले नसल्याने ही ब्रिटिशकालीन ऐतिहासिक वास्तू दुर्लक्षित झाली. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात या वास्तूने कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी चोख व भक्कमपणे पार पाडली तसेच अनेक स्थित्यंतरे पहिली आहेत. या वास्तूचा एक वेगळाच दबदबा होता. या वास्तूचे दगडी चिरेबंदी व विटांचे बांधकाम आहे. प्रशासनाचे या महत्त्वाच्या वास्तूकडे दुर्लक्ष आहे.

# बोर्ली येथे दिर्घायु हेल्थ केअर सेंटरचे उद्घाटन; रुग्णांना सुविधा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीत असणाऱ्या चिकणी येथील सामाजिक कार्यकर्ते भिकेश दिवेकर यांची मुलगी डॉ. मानसी दिवेकर यांनी बोर्ली येथील दिर्घायु हेल्थ केअर सेंटर उभारले आहे. याचे उद्घाटन अनंत काशिनाथ दिवेकर आणि अरुणा दिवेकर यांच्या हस्ते उपस्थितीत करण्यात आले.





उद्घाटन समारंभास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक, बोर्ली व्यापारी संघटनेचे अध्यक्ष जयवंत अंबाजी, दत्ताराम बेलोसे, नथुराम महाडिक, नरेश लाड, रूपेश बोरे, हेमंत चाळके, रमेश दिवेकर, सूर्यकांत जंगम, लहू चाचे, अंकुश चाचे, श्रीराम बेलोसे, किशोर चवरकर, दर्गे, नंदकुमार काते, सुरेश महाडिक, दिनेश दिवेकर, निलेश दिवेकर, संतोष कोदेरे, सरोज दिवेकर, सोहम कवळे, साहिल तटकरे, राज मसाल, हर्षल तटकरे, यश मसाल, अथर्व दिवेकर, मंगेश सुर्वे, संतोष मुरूडकर, अरुण कुंभार, प्रणिता महाडिक, साहिल सानप, शशांक कासार यांच्यासह बोर्ली ग्रामस्थ व दिवेकर कुटुंबीय उपस्थित होते.

या वेळी राष्ट्रवादीचे नेते सुबोध महाडिक यांनी समाजातील मुले उत्तुंग भरारी घेत आहेत याचा खूप आनंद होत आहे. डॉक्टर झाल्याने मानसी दिवेकर यांच्या हातून निश्चित गरिबांची सेवा घडणार आहे, असा विश्वास व्यक्त केला.

डॉ. मानसी दिवेकर यांनी ग्रामीण भागातील ग्रामस्थांना आरोग्याविषयी चांगली सेवा देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे. बोर्ली भागात अनेक गावे येतात. त्यांना तातडीची रुग्ण सेवा देण्यासाठीच आपण दिर्घायु हेल्थ केअर सेंटर सुरू केल्याचा आवर्जून उल्लेख केला. या कार्यक्रमासाठी ग्रामस्थ उपस्थित होते.

# अंजुमन इस्लाम कॉलेजतर्फे मांजरी येथे वृक्षारोपण

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील अंजुमन इस्लाम जंजिरा विज्ञान पदवी महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग तसेच सामाजिक वनीकरण विभाग रायगड जिल्हा मुरूड विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मांजरी गावातील रस्त्याच्या दुतर्फा सुमारे ६० विविध रोपांची लागवड या वेळी करण्यात आली.

झाडांची कत्तल, वातावरणातील बदल आणि वाढणारी उष्णता यामुळे सर्व सजीवांना याचा त्रास होत आहे. आपल्या कोकणामध्ये जैवविविधता प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे ती अबाधित ठेवणे हे आम्हा सर्वांचे कर्तव्य आहे. अंजुमन इस्लाम जंजिरा विज्ञान पदवी महाविद्यालय दरवर्षी वृक्षारोपण करीत असते. यंदा मांजरी येथे आवळा, चिंच, करंज, कांचन, बांबू, बहावा, गुलमोहर अशी विविध प्रकारची झाडे लावून पर्यावरणाचे जतन व संगोपन करण्याचे काम महाविद्यालयातर्फे करण्यात येत आहे.

वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. फिरोज शेख व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. रहीम बागवान तसेच विद्यार्थ्यांनी वृक्षलागवडीमध्ये परिश्रम घेतले.




# लोणेरे विद्यापीठात जागतिक चर्चासत्र उत्साहात

## नवीन शैक्षणिक धोरणासह विविध विषयांवर मंथन

**माणगाव : प्रतिनिधी**

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेमार्फत भारतीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य कार्यक्रम, परराष्ट्र मंत्रालय अंतर्गत लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठात जागतिक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. कारभारी विश्वनाथ काळे यांनी १९ देशांतील ३०पेक्षा अधिक प्रतिनिधींशी चर्चा साधताना विद्यापीठामार्फत राबविले जाणारे विविध उपक्रम तसेच नवीन शैक्षणिक धोरण-२०२० आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्कृती विकसित होण्याकरिता मदत होईल, असे मत व्यक्त केले.

चर्चासत्रात विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अरविंद किवळेकर, अधिष्ठाता डॉ. संजय नलबलवार (शैक्षणिक), डॉ. एस.एम. पोरे (संशोधन व विकास), आंतरराष्ट्रीय कार्यक्रम संचालक डॉ. नीरज अग्रवाल आणि वित्त अधिकारी ओंकार अंबपकर यांची प्रमुख उपस्थिती होती.




या चर्चासत्रात टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या भारतीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य कार्यक्रम समन्वयक प्रा. मधुश्री शेखर तसेच जगातील प्रतिनिधींनी आणि विद्यापीठातील सर्व विभागप्रमुखांनी सहभाग दर्शविला. चर्चासत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधन तसेच शैक्षणिक आदान-प्रदान व सर्वसमावेशक सर्वांगीण विकास या विषयावर चर्चा झाली तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ व आंतरराष्ट्रीय संस्था यांच्यामध्ये सामंजस्य करार करून संशोधन तसेच शैक्षणिक आदान-प्रदान व सर्वसमावेशक सर्वांगीण विकास साधण्यासाठी धोरणात्मक चर्चा करण्यात आली.

चर्चासत्राचे सूत्रसंचालन डॉ. नीरज अग्रवाल यांनी केले, तर आभार डॉ. नवीन खंडारे यांनी मानले. या चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी इनक्युबेशन सेंटर व विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी यांनी अथक प्रयत्न केले.

# चौल नगरीतील गाण्याची युट्यूब, सोशल मीडियावर धूम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल येथील मोरया कला अकॅडमीच्या सौजन्याने चौलनगरीत चित्रीत, स्थानिक कलाकारांचा सहभाग असलेल्या आणि गायक विशाल महाडिक यांच्या आवाज व संगीतरचनेचे गीत रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करीत आहे.

शिमग्याला महिनं झालं बारा असे बोल असलेले गीत तसेच दिग्दर्शन मोरया अकॅडमीचे संस्थापक नाट्य अभिनेते प्रकाश कवळे यांचे आहे. स्वरविहार प्रस्तुत या गीताचे चित्रण चौल तुलाडदेवी परिसरात करण्यात आले आहे.

संगीत अशोक अभंगे यांनी दिले आहे. गीत संयोजन पियुष पाटील, कौस्तुभ दिवेकर, ध्वनीमुद्रण अक्षय ठाकूर, कॅमेरा रोहित नाईक, तर गणेश प्रभाळे, अमित पाटील, निलेश वर्तक, सुधाकर मेस्त्री, रमेश मयेकर, धनंजय आरकिल्ले, महेंद्र वर्तक, कौस्तुभ दिवेकर, रसिका प्रभाळे, नम्रता घरत, सायली घरत, निष्ठा राणे, तनुश्री सुतार, नव्या वर्तक, विहार महाडिक, गुरू घरत, गार्गी नाईक, अन्यया प्रभाळे, आर्या प्रभाळे, आज्ञा प्रभाळे, रिया म्हात्रे, श्रीअंश म्हात्रे या कलाकारांचा सहभाग आहे.



# चांढवे बुद्रुकजवळ कारची कंटेनरला धडक; एक गंभीर, तिघांना किरकोळ दुखापत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर महाड तालुक्यातील चांढवे बुद्रुक येथे हुंडाई कार कंटेनरला मागून धडकल्याने चार जण जखमी झाले. यातील एकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे, तर अन्य तिघांना किरकोळ स्वरूपाच्या दुखापती झाल्या.

हुंडाई वेन्यू कार (एमएच ०४ एलएच ३३८)चे चालक राजाराम दत्तू कडू (वय ४०,रा.बदलापूर, जि. ठाणे) व सहप्रवासी निलेश हरिभाऊ शेलार (वय ३१,रा.टिटवाळा, जि. ठाणे), राजकुमार गुलजारराम मल्ही (वय ५७,रा.कल्याण, जि. ठाणे), प्रमोद महादेव खंडागळे (वय ३७, रा.माढा जि.सोलापूर) असे चार जण सावंतवाडी ते मुंबई महामार्गावरून प्रवास करीत होते. कार चांढवे बुद्रुक पुलावर आली असता समोरील कंटेनर चालकाने अचानक ब्रेक दाबल्याने हुंडाई कारची कंटेनरला मागून ठोकर लागून अपघात झाला. अपघातात कारमधील राजकुमार गुलजारराम मल्ही यास डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर अन्य तिघे किरकोळ जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# 'सीएसआयटी'मध्ये तीनदिवसीय योगसत्र

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या कॉलेज ऑफ सायन्स (सीएसआयटी) महाडमध्ये १९ ते २१ जून असे तीन दिवसीय योगसत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद लाभला.

या उपक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून योग साधना केंद्र महाडच्या सदस्य जान्हवी मोरे आणि सरोज पयेलकर, सहज योग केंद्राचे प्रतिनिधी राजेंद्र गावकर उपस्थित होते.

पहिल्या सत्रात राजेंद्र गावकर यांनी मेडीटेशन व त्यांचे फायदे सांगून विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. दुसऱ्या सत्रात सरोज पयेलकर यांनी विद्यार्थ्यांना कपालभाती, भ्रामरी व अनुलोम-विलोम यासारखे प्राणायाम यांचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. विद्यार्थी आणि शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने प्रात्यक्षिक पूर्ण केले.

तिसऱ्या सत्रात जान्हवी मोरे यांनी शवासन, वज्रासन, भुजंगासन, सूर्यनमस्कार, एक्यूप्रेशर सह विविध योगासनांचे प्रकार दाखवून प्रात्यक्षिके



करून घेतली. या उपक्रमाचा उद्देश मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारणे हा होता. या उपक्रमाला सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्य सुदेश कदम यांनी तणावमुक्तीसाठी आणि सामान्य आरोग्यासाठी योगाचा दैनंदिन जीवनात अवलंब करावा तसेच आपल्या व्यस्त जीवनात योगामुळे आपल्याला संतुलित राहण्यास मदत होते, असे मत मांडले. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे किशोर धारिया यांनी योगामुळे शारीरिक आणि मानसिक मनःशांती वाढते, असे मत मांडले. या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत सर्वांनी निरोगी आरोग्यासाठी योगासानांना सुरुवात करावी, असे आवाहन केले. ट्रस्टच्या संचालिका सोनाली धारिया यांनी योगामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात मदत होते, असे मत मांडले व महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी शैक्षणिक संस्थांमध्ये योगाचे महत्त्व हे विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासोबतच त्यांच्या मानसिक आणि भावनिक विकासालाही मदत करते, असे मत मांडले. सर्वांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# द. आफ्रिका सेमी फायनलमध्ये

## यजमान वेस्ट इंडिज वर्ल्डकपमधून बाहेर

**अँटिगा : वृत्तसंस्था**

उत्कंठावर्धक लढतीत दक्षिण आफ्रिकेने यजमान वेस्ट इंडिजवर तीन विकेट्सने विजय मिळवत सेमी फायनलमध्ये धडक मारली. या पराभवाने वेस्ट इंडिजच्या सेमी फायनलच्या आशा धुळीस मिळाल्या आणि त्यांचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. तीन विकेट्स पटकावणाऱ्या शम्सीला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. दरम्यान, गट २मधून दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड यांनी सेमी फायनलमध्ये आगेकूच केली आहे.



पावसाने व्यत्यय आणलेल्या सामन्यात कठीण अशा खेळपट्टीवर वेस्ट इंडिजचा संघ १३५ धावाच करू शकला. या छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचीही भंबेरी उडाली, पण तणावपूर्ण स्थितीत दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांनी संयमाने खेळ करीत बाजी मारली. पावसामुळे सामना १७ षटकांचा करण्यात आला. १६व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर कागिसो रबाडाने चौकार खेचला. शेवटच्या षटकात दक्षिण आफ्रिकेला पाच धावांची आवश्यकता होती. मार्को यान्सनने ओबेड मेकॉयच्या गोलंदाजीवर खणखणीत षटकार लगावत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

वेस्ट इंडिजच्या डावात रॉस्टन चेसने साकारलेली ५२ धावांची खेळी महत्त्वपूर्ण ठरली. काईल मेयर्सने ३५ धावा करीत त्याला चांगली साथ दिली. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ६५ चेंडूंत ८१ धावांची भागीदारी केली. या दोघांचा अपवाद वगळता वेस्ट इंडिजच्या अन्य फलंदाजांनी सपशेल निराशा केली. दक्षिण आफ्रिकेतर्फे तबरेझ शम्सीने तीन विकेट्स घेतल्या.

या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेने रीझा हेन्ड्रिक्स, क्विंटन डी कॉक आणि एडन मारक्रम यांना झटपट गमावले. हेनरिच क्लासन आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी डाव सावरला. क्लासनने गुदकेश मोटीच्या षटकात चौकार-षटकारांसह २० धावा वसूल केल्या. यामुळे लक्ष्य आटोक्यात आले, मात्र अल्झारी जोसेफच्या उसळत्या चेंडूवर क्लासन बाद झाला. त्याने २२ धावा केल्या. यानंतर स्टब्सच्या साथीला डेव्हिड मिलर आला. फिनिशर मिलरला एकेक धावेसाठी संघर्ष करावा लागला. रॉस्टन चेसने त्याला त्रिफळाचीत केले. चेसच्या गोलंदाजीवर मोठा फटका खेळण्याचा स्टब्सचा प्रयत्न मेयर्सच्या हातात जाऊन विसावला.

प्रमुख फलंदाज माघारी परतल्याने दक्षिण आफ्रिकेची चिंता वाढली. त्यातच केशव महाराजही बाद झाला. चेसनेच त्याला बाद केले. धावा आणि चेंडूचे प्रमाण नियंत्रणात असल्याने कागिसो रबाडा आणि मार्को यान्सन यांनी हिरीरिने खेळ करत संघाला विजय मिळवून दिला. वेस्ट इंडिजकडून चेसने तीन, तर आंद्रे रसेल आणि अल्झारी जोसेफ यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या.

# अमेरिकेला नमवून इंग्लंड उपांत्य फेरीत

## ■ ख्रिस जॉर्डनची हॅट्ट्रिक, बटलरचे अर्धशतक

**बार्बाडोस : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत एकाक्षणी सुपर ८ फेरीसाठी पात्र होणे खडतर झालेल्या इंग्लंडने अमेरिकेचा धुव्वा उडवत दिमाखात सेमी फायनलमध्ये प्रवेश केला. इंग्लंडने झटपट गुंडाळलेल्या या सामन्यात अमेरिकेला ११५ धावाच करता आल्या. इंग्लंडने ९.४ षटकातच हे लक्ष्य पार करत गणितीय समीकरणांविना सेमी फायनलमध्ये स्थान पटकावले. सेमी फायनलमध्ये प्रवेश करणारा इंग्लंड पहिलाच संघ आहे. मूळ बार्बाडोसचा पण इंग्लंडकडून खेळणारा ख्रिस जॉर्डन या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने हॅट्ट्रिक घेत अमेरिकेच्या डावाला खिंडार पाडले.



इंग्लंडने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. अमेरिकेचा संघ एकाक्षणी १११/५ अशा स्थितीत होता. तिथून त्यांचा ११५वरच ऑलआऊट झाला. जॉर्डनने १७ चेंडूंत अवघ्या १० धावांच्या मोबदल्यात चार विकेट्स घेतल्या. जॉर्डनने कोरे अँडरसन, अली खान, एनपी केनिंगे आणि सौरभ नेत्रावळकर यांना माघारी धाडले.

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत हॅट्ट्रिक घेणारा जॉर्डन इंग्लंडचा पहिलाच गोलंदाज आहे. काही दिवसांपूर्वीच ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने बांगलादेश आणि अफगाणिस्तानविरुद्ध सलग दोन सामन्यांत अशी कामगिरी केली होती.

अमेरिकेने पाकिस्तानला नमवत आशा जागवली, पण त्यानंतर मोठ्या संघांनी त्यांच्याविरुद्ध सहज विजय मिळवले आहेत. अमेरिकेतर्फे नितीश कुमारने ३० तर कोरे अँडरसनने २९ धावा केल्या. हरमीत सिंगने २१ धावा केल्या. आदिल रशीदच्या फिरकीचे कोडेही अमेरिकेला सोडवता आलं नाही. सॅम करन आणि रशीद यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत जॉर्डनला चांगली साथ दिली.

या छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना जोस बटलर-फिल सॉल्ट जोडीने अमेरिकेच्या आक्रमणाचा अक्षरक्ष: पालापाचोळा केला. दोन षटके सावधपणे खेळून काढल्यावर बटलरने भात्यातली सगळी अस्त्रे परजली. हरमीत सिंगने टाकलेल्या नवव्या षटकात बटलरने पाच उत्तुंग षटकार लगावले. या षटकात त्याने ३२ धावा चोपून काढल्या. इंग्लंडने ५८ चेंडूंत लक्ष्य पार केले. बटलरने ३८ चेंडूंत सहा चौकार सात षटकारांसह नाबाद ८३ धावांची खेळी केली. सॉल्टने २१ चेंडूंत २५ धावा करीत त्याला चांगली साथ दिली.

# युरो कप स्पर्धेत बेल्जियमची रोमानियावर मात

**कोलोन (जर्मनी) : वृत्तसंस्था**

कर्णधार केव्हिन डीब्रूएनेने सामन्याच्या ७३व्या सेकंदाला युरी टिलेमन्स आणि सामन्याच्या अखेरच्या टप्प्यात केलेल्या गोलमुळे बेल्जियम संघ युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेत पुन्हा एकदा विजयाच्या मार्गावर आला. बेल्जियम संघाने राजघराण्यातील व्यक्तींसमोर खेळताना रोमानियाचा २-० असा पराभव केला. बेल्जियमच्या विजयामुळे इ-गटातून बाद फेरीसाठी कमालीची चुरस निर्माण झाली असून चारही संघांचे तीन गुण आहेत.



कोलोनमध्ये हा सामना कमालीच्या विस्मयकारक वातावरणात झाला. दोन्ही गोलच्या वेळी बेल्जियमच्या हालचाली इतक्या वेगवान होत्या की रोमानियाच्या बचाव फळीला काही कळायच्या आत चेंडू गोलजाळीत गेला होता. बेल्जियमचे राजे फिलिपे आणि राणी मथिल्डे या सामन्यासाठी उपस्थित होत्या. बेल्जियमच्या विजयानंतर आता या गटातील अखेरच्या सामन्यांना फार महत्त्व प्राप्त झाले आहे. अखेरच्या सामन्यात जो जिंकेल, तो बाद फेरी गाठेल अशी परिस्थिती आहे. रोमेनिया आणि बेल्जियम यांचा गोलफरक एकचा आहे. स्लोव्हाकियाचा गोलफरक शून्यावर आहे, तर युक्रेनचा फरक -२ आहे. त्यामुळे या दोन्ही संघांचे आव्हान केवळ मोठ्या विजयावर अवलंबून असेल.

पहिल्या सामन्यात हार पत्करावी लागल्यावर बेल्जियम संघावर बरीच टीका होत होती. याचे वेगळे दडपण त्यांच्या खेळाडूंवर होते. 'आम्हाला काय करायचे हे ठाऊक होते. विजय आवश्यकच होता. अन्यथा आम्हाला घरचा रस्ता धरावा लागला असता. संघासाठी सर्वोत्तम कामगिरी करत राहण्यास मी सज्ज आहे,' असे डी ब्रूएने म्हणाला. डी ब्रूएनेची विश्वातील सर्वोत्तम मध्यरक्षकांमध्ये गणना केली जाते.

### डी ब्रूएनेचा भन्नाट गोल

लुकाकूची पाटी कोरी राहिली असली तरी त्याने सुरुवातीलाच रचलेल्या चालीवर टिलेमन्स गोल करू शकला. पूर्वार्धात रोमेनियाने अशीच वेगवान सुरुवात केली, मात्र त्यांना गोल करता आले नाहीत. कधी त्यांचे फटके गोलपोस्टच्या बाहेर गेले, तर कधी गोलरक्षकाने त्यांच्या आक्रमकांना रोखले. उत्तरार्धात स्थिरावल्यानंतर बेल्जियमने वर्चस्व राखायला सुरुवात केली. कर्णधार डी ब्रूएनेचे लागोपाठ तीन प्रयत्न अपयशी ठरले. त्याच्या फटक्यांना वेग होता, पण ताकदीचा अभाव दिसून आला, परंतु सामना संपण्यास १० मिनिटे शिल्लक असताना डी ब्रूएनेच्या भन्नाट गोलने बेल्जियमचा विजय सुनिश्चित झाला.

# क्रिकेटर केदार जाधव राजकीय मैदानात उतरणार

**पुणे : प्रतिनिधी**

जेवढे मला क्रिकेट खेळाने, महाराष्ट्राने आणि देशाने प्रेम, आपुलकी दिले आहे. माझी स्वप्ने पूर्ण होण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे नक्कीच आगामी काळात मला महाराष्ट्रासाठी आणि देशासाठी काहीतरी करायला आवडेल. मंच दुसरा असू शकतो असे संकेत देत मराठमोळा क्रिकेटपटू केदार जाधव याने राजकीय मैदानात उतरण्याचे संकेत दिले आहेत.



नुकतेच लोकसभा निवडणूक काळात केदार जाधव याने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. तेव्हाही अनेक चर्चा रंगल्या होत्या. त्यामुळे ते भाजपमध्ये जाणार का असा प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा केदार म्हणाला की, मी कुठल्या पक्षात जाणार हे सांगणे खूप लवकर होईल, परंतु नक्कीच मला काम करायला आवडेल. हे काम महाराष्ट्राच्या हितासाठी आणि देशाच्या हितासाठी असेल. माझा वेळ त्यासाठी द्यायलाही मी तयार आहे असे त्याने सांगितले होते. त्यानंतर आता त्याने जशी संधी येईल तसे मी तयार असेन, असे स्पष्ट केले आहे.

# कोपा अमेरिका स्पर्धेत व्हेनेझुएलाची विजयी सलामी

**कॅलिफोर्निया : वृत्तसंस्था**

उत्तरार्धात जॉण्डर कॅडिज आणि एडुआर्ड बेलो यांनी १० मिनिटांच्या अंतराने केलेल्या दोन गोलच्या जोरावर व्हेनेझुएलाने कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेत दमदार विजयी सलामी दिली. व्हेनेझुएलाने इक्वेडोरला २-१ असा पराभवाचा धक्का दिला.

इक्वेडोरला बहुतेक सामना १० खेळाडूंसहच खेळावा लागला. कर्णधार एनर व्हॅलेन्सियाला २२व्या मिनिटाला पंचांनी लाल कार्ड दाखवून बाहेर काढले, मात्र त्यानंतरही जेरेमी सारमिएंटोने गोल करून विश्रांतीला इक्वेडोरला आघाडीवर ठेवले होते. उत्तरार्धातही इक्वेडोर आपली ताकद ओळखून खेळत होते. त्यांनी सामन्यावर नियंत्रण राखले होते. गोल करण्याच्या संधी निर्माण करण्यात येणारे अपयश आणि त्या मिळाल्यावर गोल करण्यात आलेले अपयश अशा कात्रीत सापडलेल्या व्हेनेझुएलाच्या प्रशिक्षकांनी झटपट दोन बदल केले. हे बदल व्हेनेझुएलाच्या पथ्यावर पडले. दोन्ही राखीव खेळाडूंनी गोल करून व्हेनेझुएलाच्या विजयात महत्त्वाचा वाटा उचलला.


### इक्वेडोरचा पराभव



प्रथम ६४व्या मिनिटाला कॅडिजने पास आल्यावर क्षणाचीही उसंत न घेता १५ यार्डावरून चेंडूला गोलजाळीची दिशा देत व्हेनेझुएलाला बरोबरी साधून दिली. त्यानंतर ७४व्या मिनिटाला बेलोने गोल केला. यानंतर इक्वेडोर संघाला पुनरागमन करता आले नाही.

दरम्यान, ह्युस्टन येथे झालेल्या संघर्षपूर्ण लढतीत मेक्सिकोने जमैकाचा १-० असा पराभव करून विजयी सलामी दिली, मात्र सामन्यात कर्णधार एडसन अल्वारेझ जखमी झाल्याने मेक्सिकोसमोरील चिंता वाढल्या आहेत. जमैकाचा गोलरक्षक जमाली वेटने सामन्यात सहा गोल वाचवले. ६९व्या मिनिटाला जेरार्डो अर्टेगाने मेक्सिकोला आघाडीवर नेले. मेक्सिकोने आघाडी अखेरपर्यंत राखली.

# 'नाडा'च्या कारवाईमुळे कुस्तीपटू बजरंग पुनियाचा पाय खोलात



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा कुस्तीपटू बजरंग पुनियाला नॅशनल अँटी डोपिंग एजन्सीने (नाडा) पुन्हा निलंबित केले आहे. या संदर्भात बजरंग पुनियाला नोटीसही बजावण्यात आली आहे. नॅशनल अँटी डोपिंग नियमांचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती सांगण्यात येत आहे तसेच बजरंग पुनियाला बजावलेल्या नोटिशीला उत्तर देण्यासाठी ११ जुलैपर्यंत वेळ देण्यात आली आहे.

याआधी बजरंग पुनियाला 'नाडा'ने निलंबित केले होते तसेच तीन आठवड्यांनंतर डोपिंग विरोधी शिस्तपालन समितीने हे निलंबन मागे घेतले होते, कारण त्या वेळी बजरंग पुनियाला नोटीस बजावण्यात आली नव्हती. आता मात्र नाडाने बजरंग पुनियावर निलंबनाची कारवाई करीत नोटीसही बजावली आहे. त्यामुळे बजरंग पुनियाच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

ऑलिम्पिक खेळांमध्ये भाग घेण्यासाठी आशियाई पात्रता स्पर्धेच्या राष्ट्रीय चाचण्यांदरम्यान नाडाने बजरंग पुनियाला मलमुत्र चाचणीसाठी नमुने देण्यास सांगितले होते, मात्र बजरंग पुनियाने त्यासाठी नकार दिला होता. त्यानंतर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती, मात्र त्यानंतर निलंबनाविरुद्ध अपील करण्यात आले होते.

> याआधी ज्या वेळी निलंबनाची कारवाई झाली होती तेव्हा चाचणीस आपण कधीच नकार दिला नव्हता, मात्र चाचणीसाठी मुदत संपलेले साहित्य वापरण्यात येत असल्याबद्दल आपण त्याबाबत विचारणा केली होती.
>
> -बजरंग पुनिया, निलंबित कुस्तीपटू

त्यानंतर शिस्तपालन समितीने जोपर्यंत नाडा आरोपांची नोटीस जारी करीत नाही तोपर्यंत निलंबन रद्द राहील, असे म्हटले होते.

आता नाडाने पुन्हा बजरंग पुनियावर कारवाई करीत नोटीस पाठवली आहे. बजरंगला पाठवण्यात आलेल्या नोटीसीमध्ये नाडाने म्हटले की, ही एक औपचारिक नोटीस आहे. यामध्ये तुमच्यावर नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. आता तात्पुरते निलंबित करण्यात आले आहे.

# वर्ल्डकपमधील पाकिस्तानच्या खराब कामगिरीबद्दल संसदेतही खडाजंगी

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

ट्वेन्टी-२० विश्वचषकात पाकिस्तानच्या खराब कामगिरीनंतर बाबर आझम आणि त्याच्या संघावर सर्व बाजूंनी टीका होत आहे. आता हे प्रकरण पाकिस्तानच्या संसदेत पोहचले आहे. तिथे अब्दुल कादिर पटेल नावाच्या खासदाराने आझम आणि संघावर टीकास्त्र सोडले. संसदेत बोलताना खासदाराने पाकिस्तानी संघावर टीकेचे बाण सोडले. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांचा उल्लेख करत त्यांनी आपल्या संघाला घरचा आहेर दिला.



खासदार अब्दुल कादिर पटेल म्हणाले की, पाकिस्तानच्या क्रिकेट संघाला काय झाले आहे. ते अमेरिकेकडूनदेखील पराभूत झाले. पाकिस्तानचा भारतीय संघानेही पराभव केला. बाबर आझमने आपल्याच एका वरिष्ठ खेळाडूकडून धडा घेतला पाहिजे, कागदपत्रे दाखवत माझ्याविरोधात षडयंत्र रचले जात असल्याचे सांगायला हवे. असे केल्याने बाबर आझम संपूर्ण प्रकरण शांत करू शकतो. खरेतर अविश्वास प्रस्तावादरम्यान इम्रान खान यांनी पॅम्प्लेट दाखवताना तेच शब्द बोलले होते, ज्याचा उल्लेख अब्दुल कादिर पटेल यांनी केला आहे.

दरम्यान, मागील ट्वेन्टी-२० विश्वचषकातील उपविजेता पाकिस्तानचा संघ या वेळी काही खास कामगिरी करू शकला नाही. त्यांना आपल्या सुरुवातीच्या दोन्हीही सामन्यांमध्ये पराभव पत्करावा लागला. कॅनडाविरूद्धचा सामना कसाबसा जिंकून बाबर आझमच्या संघाने विजयाचे खाते उघडले.

# इरफान पठाणच्या सहकाऱ्याचा मृत्यू


**बिजनौर : वृत्तसंस्था**

सध्या वेस्ट इंडिज-अमेरिकेत टी-२० वर्ल्डकप स्पर्धा सुरू आहे. माजी भारतीय खेळाडू इरफान पठाण मॅचमध्ये कॉमेंट्री करण्यासाठी वेस्ट इंडिजमध्ये आहे. इरफानने मेकअप आर्टिस्ट फैयाज अन्सारीला वेस्ट इंडिजला नेले. फैयाजचा एका हॉटेलमध्ये स्विमिंग पूलमध्ये पोहताना बुडून मृत्यू झाला आहे. दोन महिन्यापूर्वीच फैयाजचे लग्न झाले होते. आठ दिवसांपूर्वी तो बिजनौरहून मुंबईला गेला होता.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com